# कार्यक्रम अंदाजपत्रक
# २०२४-२५
# मराठी भाषा विभाग

**अनुक्रमणिका**


| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना | .. | .. | (पाच) |
| २. | मराठी भाषा विभाग, मंत्रालय | .. | .. | ०२ |
| ३. | भाषा संचालनालय | .. | .. | १३ |
| ४. | राज्य मराठी विकास संस्था | .. | .. | २५ |
| ५. | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | .. | .. | ४१ |
| ६. | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | .. | .. | ४५ |

## कार्यक्रम क्रमांक १

## प्रस्तावना

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये "मराठी भाषा विभाग"असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१२/१०८/१८ (र. व. का.), दिनांक २९ नोव्हेंबर २०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अखत्यारित असलेले मराठी भाषेशी संबंधित विषय तसेच, मराठी भाषाविषयक कामकाज हाताळणारी खालील कार्यालये / संस्था / मंडळे मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आली आहेत :-

१. भाषा संचालनालय

२. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

३. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

४. राज्य मराठी विकास संस्था

वित्तीय आवश्यकता

(ii) Financial requirements

(रक्कम रुपये लाखात)

| | अर्थसंकल्प २०२३-२४ Budget 2023-24 | | | सुधारित अंदाज २०२३-२४ Revised Estimates 2023-24 | | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ Budget Estimates 2024-25 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** |
| **(अ) कार्यालयनिहाय तरतुदी** | | | | | | | | | |
| (१) मराठी भाषा विभाग (खुद्द) | ६००३६ | ३७५८.०० | ४३५८.३६ | ४९१.०६ | ३००८.६० | ३४९९.६६ | ६७४.०३ | ४१८०.०० | ४८५४.०३ |
| (२) भाषा संचालनालय | १०४७.७८ | - | १०४७.७८ | ९८०.५० | - | ९८०.५० | ११४१.२० | - | ११४१.२० |
| (३) राज्य मराठी विकास संस्था | २२४.१८ | २०००.०० | २२२४.१८ | १९५.९९ | २०००.०० | २१९५.९९ | २३२.९० | २२२८.०० | २४६०.९० |
| (४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | ३५४.४८ | ५९२.०० | ९४६.४८ | २८१.०६ | ५९२.०० | ८७३.०६ | ३५८.५५ | १५९२.०० | १९५०.५५ |
| (५) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | ३४०.०४ | १५०.०० | ४९०.०४ | ३३४.०१ | १०५.०० | ४३९.०१ | ४०३.४१ | १००.०० | ५०३.४१ |
| **एकूण (अ)** | **२५६६.८४** | **६५००.००** | **९०६६.८४** | **२२८२.६२** | **५७०५.६०** | **७९८८.२२** | **२८१०.०९** | **८१००.००** | **१०९१०.०९** |
| | | | | | | | | | |
| (१) ठेव संलग्न विमा योजना | २.४० | ० | २.४० | २.४० | ० | २.४० | २.४० | ० | २.४० |
| (२) शासकीय कर्मचाऱ्यांना प्रदाने | २०२.६१ | ० | २०२.६१ | २०२.४१ | ० | २०२.४१ | २२६.०१ | ० | २२६.०१ |
| **एकूण (ब)** | **२०५.०१** | **०** | **२०५.०१** | **२०४.८१** | **०** | **२०४.८१** | **२२८.४१** | **०** | **२२८.४१** |
| **एकूण (अ+ब)** | **२७७१.८५** | **६५००.००** | **९२७१.८५** | **२४८७.४३** | **५७०५.६०** | **८१९३.०३** | **३०३८.५०** | **८१००.००** | **१११३८.५०** |

## कार्यक्रम क्रमांक-२

## मराठी भाषा विभाग, मंत्रालय

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये “मराठी भाषा विभाग” असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१२/१०८/१८ (र. व. का.), दिनांक २९ नोव्हेंबर २०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. मराठी भाषा विभागाचे मुख्य उद्दीष्ट मराठी भाषेचा प्रसार, प्रचार, विकास, जतन व संवर्धन हे आहे. विभागाकडून खालील कामकाज हाताळण्यात येते.

**(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे :-**

भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून कार्यवाही केली जाते. अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने कळविलेल्या निकषांच्या अनुषंगाने मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पात्र ठरते किंवा कसे, याबाबतचा अभ्यास करून केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यासाठी राज्य शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा तज्ज्ञांची एक समिती दि.१० जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार स्थापन केली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबतचा परिपूर्ण अहवाल शासनाने दि.१२ जुलै, २०१३ रोजी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविला आहे. मराठी भाषा ही अभिजात भाषेसंबंधीचे केंद्र शासनाने विहित केलेले सर्व निकष पूर्ण करीत असल्याने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा याबाबत शासनाकडून सचिव / प्रधान सचिव, मा.मुख्य सचिव, मा.मंत्री व मा. मुख्यमंत्री यांचे स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांचे स्वाक्षरीने मा. पंतप्रधान महोदयांना दि.२४.०८.२०२२ रोजीचे पत्र अग्रेषित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे. तसेच मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या दि. १४.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री, संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांना तसेच, दि. ०५.०७.२०२३ रोजीच्या सचिव, मराठी भाषा यांच्या अ.शा. पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडून भाषांना अभिजात दर्जा देण्याच्या अनुषंगाने सुधारीत निकष निश्चित झाले आहेत किंवा कसे? सदर निकष निश्चित झाले असल्यास राज्य शासनास तातडीने कळविण्याबाबत संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांना सचिव, मराठी भाषा यांच्या दि. ३०.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

**(२) प्रशासनिक व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढविणे :-**

दिनांक १ मे, १९६० रोजी जेव्हा महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा शासनाने शक्य तितक्या लवकर इंग्रजीऐवजी मराठीतूनच राज्यकारभार करण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगिकार करण्यात आला. तद्नंतर, “महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६, ”

च्या अधिसूचनेन्वये दिनांक १ मे, १९६६ पासून "वर्जित प्रयोजने " वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य करण्यात आले. यामध्ये नमूद करण्यात आलेली "वर्जित प्रयोजने " सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आहेत :—

१. केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

२. अन्य राज्यांशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

३. परराष्ट्रांचे दूतावास यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

४. महालेखापाल कार्यालयाशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच, त्यांच्याकडे द्यावयाचे लेखे.

५. न्यायालयीन व विधिविषयक बाबी.

६. वैद्यकीय औषधी योजना, अहवाल आणि वैद्यकीय अहवालातील तांत्रिक बाबी.

**(अ) शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ व्हावे म्हणून शासनाने खालील उपाययोजना केलेली आहे :-**

**१)** शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने, आवश्यक असलेल्या भाषिक क्षमता व कौशल्ये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी भाषा संचालनालयाकडून मराठी भाषा परीक्षा घेण्यात येते. इंग्रजी लघुलेखक/लघुटंकलेखक/टंकलेखक/लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयाकडून घेण्यात येणारी मराठी लघुलेखन/टंकलेखन परीक्षा तसेच केंद्रीय कामकाजाची भाषा हिंदी असल्यामुळे ज्या शासकीय कर्मचारी/अधिकारी यांनी एस.एस.सी. परीक्षेत हिंदी विषय घेऊन परीक्षा उर्तीर्ण केली नसेल त्यांच्यासाठी भाषा संचालनालयामार्फत हिंदी भाषा परीक्षा घेण्यात येते.

या परीक्षा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत या परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत रोखून ठेवल्या जातात.

**२)** विभागाच्या अधीनस्त असलेल्या भाषा संचालनालयामार्फत प्रमाण नमुने, सर्वसाधारण नमुने व विशेष नमुने, संक्षिप्त शेऱ्यांची पुस्तिका उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, शासकीय कर्मचाऱ्यांना मराठीतून टिपण्या व पत्रव्यवहार करणे सुलभ व्हावे या उद्देशाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल असे साहित्य, पुस्तके, शुद्धलेखन नियमावली, विविध परिभाषा कोश, शब्दावल्या तयार करण्यात येऊन त्यांच्या प्रती शासकीय कार्यालयांना पुरविण्यात आल्या आहेत. तसेच, प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी वापर होण्यासाठी भाषा संचालनालयाने यापैकी बहुतेक माहिती भ्रमणध्वनी उपयोजकावर देखील उपलब्ध केली आहे.

**(ब) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम (सुधारणा), २०२१, दि. १६ जुलै, २०२१ :-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६ जुलै, २०२१ **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात आला आहे.

सदर अधिनियमामध्ये खालील प्रमाणे महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत :-

१. शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत,

२. राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधित त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल.

३. मराठी भाषा अधिकारी प्रत्येक कार्यालयात नेमण्यात येईल,

४. सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांवर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील,

५. सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

६. अधिनियमातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे, मराठी भाषेचा वापर न करण्याबाबतच्या तक्रारींचे निराकरण करणे आणि मराठी भाषेसंदर्भात विभागाने वेळोवेळी जाहिर केलेले उपक्रम राबविणे इत्यादी सर्व बाबींसंदर्भात जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली Ėजिल्हा मराठी भाषा समितीŠ महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६ जुलै, २०२१ अन्वये स्थापन करण्यात आली आहे,

७. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी तसेच, सल्ला देण्यासाठी **राज्यस्तरावर Ėराज्य मराठी भाषा समिती स्थापनŠ** करण्यात आलेली आहे. या समितीचे अध्यक्ष मा.मंत्री, मराठी भाषा असून, उपाध्यक्ष मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे आहेत.

**(क) महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ :-**

स्थानिक प्राधिकरणे म्हणजे महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अन्य कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था, नियोजन प्राधिकरण, राज्य सरकारची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या कार्यालयीन कामकाजात आणि जनसंवाद व जनहिताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर करणे या अधिनियमान्वये बंधनकारक करण्यात येणार आहे. सदर अधिनियम शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६२/भाषा-२, दि.९ मे, २०२२ अन्वये देखील उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**(ड) महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम, २०२०, दि.०९ मार्च, २०२० :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी तिचा अभ्यास शालेय स्तरापासून करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षणामध्ये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या राज्यातील सर्व प्रकारच्या शिक्षण मंडळांच्या शाळांमधून मराठी भाषा विषय अनिवार्य करण्याबाबतचा "महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम , २०२० " दि. १ एप्रिल, २०२१ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला आहे. या संदर्भात नियम तयार करण्याची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून सुरू आहे.

**(१) मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे -**

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणानुसार मराठी भाषेचा विकास, संवर्धन, जतन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने सन २०१० पासून स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागाच्या अखत्यारीत असलेली ४ क्षेत्रीय कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यान्वीत असून या कार्यालयांचा आपापसात समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एकाच इमारतीत असण्याची आवश्यकता विचारात घेऊन मराठी भाषा विभागाच्या निर्मितीनंतर राज्याचे सांस्कृतिक धोरण- २०१० मध्ये शिफारस केलेले " मराठी भाषा भवन" उभारण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मराठी भाषा भवन मुख्य केंद्र दक्षिण मुंबई किंवा वांद्रे-कुर्ला परिसरामध्ये व उपकेंद्र ऐरोली, नवी मुंबई येथे उभारण्यास मान्यता देण्यात आली. या संदर्भात दि. ५ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले

**अ) मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र, चर्नी मार्ग, मुंबई :-**

मा. मंत्रिमंडळाच्या दि.२४.०३.२०२१ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयास अनुसरुन शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१२.०७.२०२१ अन्वये मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई या इमारतीच्या बांधकामाकरिता गिरगांव महसूल विभागातील भूखंड क्र.१७३६ मधील अंदाजे २०८५ चौ.मी. इतका भूखंड मराठी भाषा विभागास हस्तांतरित करण्यात आला आहे.

दि.३०.११.२०२२ व दि.२५.०१.२०२३ रोजीच्या बैठकांमध्ये मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण विभागाच्या भूखंडांचा एकत्रित विकास करून मराठी भाषा भवन उभारण्यासंबंधी निर्णय झाला. तसेच सदर प्रकल्पासंबंधी आराखडे सुधारीत करण्याच्या सूचना वास्तूविशारदांना देण्यात आल्या. मा.मंत्रिमंडळाच्या दि.१९.०४.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मराठी भाषा भवन व शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयाची इमारत यांची अशी एक संयुक्त भव्य इमारत उभारण्याकरिता मराठी भाषा विभागाच्या व शालेय शिक्षण विभागाच्या भूखंडाचे एकत्रीकरण करण्यास व त्याकरिता वास्तूविशारद यांनी सादर केलेल्या सुधारीत आराखड्यांना मान्यता दिली.

महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन दि.२३.०८.२०२३ अन्वये मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई करिता गिरगांव महसूली विभागातील भूकर क्र.१७३६ सुधारीत क्षेत्र ३७७० चौ.मी. चा मराठी भाषा विभाग व शालेय शिक्षण विभाग यांच्यामार्फत संयुक्तरित्या विकास करण्याकरिता ना-हरकत देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.०१.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर भूखंड मराठी भाषा विभागास हस्तांतरीत केला आहे. दि.१८.१०.२०२३ रोजीच्या ताबा पावतीन्वये सदर भूखंडाचा ताबा मराठी भाषा विभागास प्राप्त झाला आहे.

मा. मंत्रिमंडळाच्या दि.२९.११.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पांचे वास्तूविशारद मे. पी.के.दास ॲन्ड असोसिएटस यांनी सुधारीत आराखड्यांचे सादरीकरण केले. सदर बैठकीमध्ये मा. मंत्रिमंडळाने इमारतीच्या बांधकाम आराखडे, मराठी भाषा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील भूखंडाबाबत अंशत: अदलाबदल करून भूखंडाच्या पुढील बाजूस मराठी भाषा भवन व मागील बाजूस सावित्रीबाई फुले वसतिगृह अशा दोन स्वतंत्र इमारतींचे बांधकाम करणे, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची बांधकाम अभिकरण म्हणून नियुक्ती करण्यास व त्यांच्यामार्फत नवीन निविदा प्रक्रिया करणे या बाबींना मान्यता दिली आहे. सदर मंत्रिमंडळ निर्णयास अनुसरुन दि.१५.१२.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई या इमारतीच्या बांधकाम खर्चाचे सादर केलेले ढोबळ अंदाजपत्रक मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्यात आले असता समितीने अंदाजित रु.१५०.१४ कोटी इतक्या बांधकाम खर्चास सहमती दर्शविली . त्यास अनुसरुन शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.०१.०३.२०२४ अन्वये मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई या इमारतीकरिता रु.१५०.१४ कोटी इतक्या बांधकाम खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये रु.३९.६३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित आहे.

**ब) मराठी भाषा भवन, उपकेंद्र, ऐरोली -**

सिडको महामंडळाकडून संपादित भूखंड क्र. ६अ, सेक्टर क्र. १३. ऐरोली, नवी मुंबई येथे मराठी भाषा भवन उपकेंद्र इमारतीची उभारणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या अभिकरणामार्फत करण्यात येणार आहे. दि. ३ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पाकरिता सुमारे रु. २४.९८ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ऐरोली नवी मुंबई येथील मराठी भाषा भवन उपकेंद्र या इमारतीच्या बांधकामाकरिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये रु. १०.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने वेळोवेळी झालेल्या बैठकीत प्रकल्पाचे आराखडे सुधारीत करण्याबाबत निर्णय झाले. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून सदर प्रकल्पाचे आराखडे एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली -२०२० नुसार सादर करण्याचे कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाचे आराखडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**(२) मराठी भाषा धोरण -**

श्री.लक्ष्मीकांत देशमुख, अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांनी श्री. नागनाथ कोतापल्ले व श्री.सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या धोरणामधील समान व महत्वाच्या शिफारसी (काही बदलांसह वा भर घालून) कायम ठेवत कालानुरुप बदल लक्षात घेऊन नव्याने मराठी भाषा धोरणाचा मसुदा शासनास सादर केला होता.

सदर धोरणातील शिफारसींच्या अनुषंगाने अंमलबजावणी करणाऱ्या मंत्रालयीन विभाग व अधिनस्त कार्यालये यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले. तसेच सचिव, मराठी भाषा व मा.मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली बैठका आयोजित करून धोरणातील शिफारसींसंदर्भात चर्चा करण्यात आली.

मराठी भाषा धोरणाच्या अनुषंगाने विविध मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायांना व विविध बैठकांमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन मराठी भाषेच्या धोरणाचा मसुदा मा. मंत्रिमंडळाच्या दि.१३.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला होता. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि राज्याच्या मराठी भाषा धोरणास मान्यता देण्याचा निर्णय घेतला.

मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.१४.०३.२०२४ अन्वये राज्याचे मराठी भाषा धोरण जाहीर करण्यात आले आहे.

मराठी भाषा धोरणामध्ये शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, संगणकीय शिक्षण, विधी व न्याय व्यवहार, वित्त व उद्योगजगत, प्रसारमाध्यमे इ. व्यवहारक्षेत्र निहाय सविस्तर शिफारसी प्रस्तावित आहेत.

आगामी २५ वर्षामध्ये मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे, विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षण मराठी माध्यमात उपलब्ध करून देणे, मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करणे, सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे, बोली भाषांचे जतन व संवर्धन तसेच मराठी भाषेला राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर महत्वाची भाषा म्हणून प्रस्थापित करणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्याच्या अनुषंगाने या धोरणामध्ये शिफारसी अंतर्भूत केल्या आहेत.

**(५) विधानमंडळ मराठी भाषा समिती :-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये Ė मराठी Š ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्विकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रात राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा सक्षमपणे वापर करणे हे शासनाचे धोरण आहे. या धोरणाचा काटेकोरपणे अवलंब व्हावा व मराठी भाषेच्या वापरासंबंधी सर्व राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या कामाचा आढावा घेतला जावा या उद्देशाने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली, Ėसंयुक्त विधिमंडळ मराठी भाषा समिती Š स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून राज्यातील शासकीय कार्यालयांचा व स्थानिक संस्थांच्या कामाचा आढावा घेण्यात येतो व प्रशासनाच्या कामात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, यादृष्टीने समितीकडून विविध सूचना व उपाययोजना सुचविण्यात येतात.

**(६) आंतरराष्ट्रीय मराठी मंच स्थापन करणे** -

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व संवर्धन करणे हे विभागाचे धोरण आहे. अनेक मराठी भाषक परदेशात मराठी भाषेच्या संदर्भात विविध उपक्रम, कार्यक्रम राबवून आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी भाषेचा प्रचार-प्रसार व संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात. सदर बाब शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे विविध देशातील मराठी भाषक आणि मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या संस्थांना एका छत्राखाली आणून त्यांच्या उपक्रमांना शासनस्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०२२ अन्वये आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना करून त्यासाठी समन्वयक नेमण्यात आले आहेत.

.**(७) मराठी भाषा संवर्धनाकरिता विविध वार्षिक उपक्रम :-**

**(अ) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** :-

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करून वृद्धिंगत करण्यासाठी दरवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " म्हणुन साजरा करण्यात येत होता. सदर " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " सन २०२१ पासून दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० अन्वये घेण्यात आला आहे. या कालावधीत शाळा, महाविद्यालये यांच्या सहभागाबरोबरच सर्व प्रशासनिक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, राज्यातील सर्व केंद्रीय कार्यालये, बँका, वाणिज्य संस्था इत्यादी

कार्यालयांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

**(आ) मराठी भाषा गौरव दिन (दिनांक २७ फेब्रुवारी) :** ज्येष्ठ कवी, वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३ अन्वये दिनांक २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन राज्यभर "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इत्यादि कार्यालयांनी समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

शासनातर्फे या दिवशी (१) मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास **विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार**, (२) उत्कृष्ट प्रकाशन संस्थेस **श्री. पु. भागवत पुरस्कार**, मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेस (३)आंतरराष्ट्रीय किर्तीचे ज्येष्ठ भाषा वैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉ. अशोक केळकर यांच्या नावे "**मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार**" २ पुरस्कार (व्यक्ती व संस्था) व (४) कवितेच्या माध्यमातून भाषा संवर्धनाचे कार्य करणाऱ्या कवीवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या नावे **"मराठी भाषा संवर्धक पुरस्कार"** २ पुरस्कार (व्यक्ती व संस्था) असे पुरस्कार त्याचप्रमाणे (५) उत्कृष्ट मराठी वाङमय निर्मितीस " स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङमय पुरस्कार " (३५ पुरस्कार) या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

**(इ) वाचन प्रेरणा दिन (दिनांक १५ ऑक्टोबर)** :- माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दिंगत करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी " वाचन प्रेरणा दिन " साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

**(ई) मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी राज्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि अधिनस्त कार्यालये यांच्या सहकार्याने सुरु करण्यात आलेले विविध उपक्रम :-**

मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराच्या हेतूने मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०२०/प्र.क.९८/भाषा-२, दि. २४ जून, २०२२ अन्वये सध्या सुरू असलेल्या उपरोक्त तीन उपक्रमांबरोबरच पुढील आठ उपक्रम राज्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, अधिनस्त कार्यालये यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आले आहेत.

१. शैक्षणिक स्तरावर मराठी भाषेचा वापर वाढविणे.

२. ग्रंथालयांना पुस्तकांच्या स्वरूपात सहाय्य करणे.

३. तांत्रिकदृष्ट्या मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी निधी .

४. साहित्यिकांचा सन्मान, ज्येष्ठ साहित्यिकांच्या जन्मशताब्दी वर्षाचे आयोजन आणि मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचा शताब्दी सोहळा यासाठी निधी.

५. सीमावर्ती भागात मराठी भाषेसंदर्भात कार्यरत असणाऱ्या संस्थांना निधी .

६. शैक्षणिक अभ्यासक्रमाबाहेरील मराठी भाषेतील प्राविण्याबाबतच्या परीक्षा.

७. माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या मदतीने मराठी प्रचार-प्रसारासंबंधी जाहिराती तयार करणे.

८. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी उपक्रम मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या स्तरावर राबविणे.

सदर उपक्रम विभागीय आणि जिल्हा स्तरावर राबविण्यासाठी ६ विभागीय आयुक्त आणि ३६ जिल्हाधिकारी यांना निधी देण्याचा निर्णय शासन निर्णय दि. २४ जून, २०२२ अन्वये घेण्यात आला आहे.

**(उ) Ėमराठी भाषेची वैश्विक व्याप्ती - विश्व मराठी संमेलन-२०२४Š :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार वैश्विक स्तरावर होण्यासाठी, मुंबई येथे ४ जानेवारी ते ६ जानेवारी-२०२३ या कालावधीत प्रथमच "मराठी तितुका मेळवावा" – "विश्व मराठी संमेलन"आयोजित केले होते. दि.२ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन-२०२४ च्या संमेलनास प्रशासकीय मान्यता देण्यात असून, त्यानुसार गतवर्षीप्रमाणेच यावर्षीही त्याच धर्तीवर दि.**२७** ते **२९** जानेवारी, **२०२४** रोजी Ėमराठी भाषेची वैश्विक व्याप्ती - विश्व मराठी संमेलन-**२०२४**Š चे आयोजन करण्यात आले होते.

**(ऊ) शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबत -**

शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या sदि. ६ नोव्हेंबर, २००९ चा मूळ शासन निर्णय अधिक्रमित करून सदर शासन निर्णयातील मूलभूत बाबींमध्ये बदल न करता, केवळ काही अनुषंगिक बाबींचा समावेश शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर, २०२२ अन्वये करण्यात आला

**(८) पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करणेबाबत :-**

पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करणेबाबत मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने पुस्तकाचे गाव विस्तार ही योजना प्रत्येक जिल्ह्यात सुरु करण्याचा निर्णय दि.०४.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रथमतः ६ महसुली विभागात पुस्तकांचे गाव सुरु करण्यात येणार आहे. त्यानुसार दि.२५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये ४ गावांना मान्यता देण्यात आली आहे.

**(९) बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी अनुदान :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरणाशी सुसंगत पारंपारिक पध्दतीने प्रचार प्रसार करण्याबरोबर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध माध्यमांचा वापर करून मराठी प्रचार प्रसारविषयक कार्यक्रम महाराष्ट्र राज्याबाहेर आयोजित करण्यास रु.२५ लक्ष इतके अनुदान देण्याचा दि.२३.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

**(१०) युवक मंडळे स्थापन करणे व अनुदान देण्याबाबत :-**

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे व त्यांना कार्यक्रम/उपक्रम करण्याच्या अटीवर वार्षिक रु.१०,०००/- (दहा हजार रुपये) इतके अनुदान देण्यास व सदरचा उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्याचा निर्णय दि.१३.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

**(११) महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, गोवा येथे मराठी भाषिकांसाठी विविध भाषिक उपक्रम सूरु करणे हा नवीन उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत सुरु करण्याबाबत :-**

अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करण्याची तरतूद राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेत आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली व गोवा यांना मराठीच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित करण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रत्येकी रु.१० लक्ष इतका निधी राज्य मराठी विकास संस्थेच्या निधीतून देण्याच्या उपक्रमास दि.१३.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता घेण्यात आली आहे.

**मराठी भाषा विभागाची माहिती https://marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**विभागाची संरचना**

मंत्री

⇓

अपर मुख्य सचिव

⇓

सह/ उप सचिव

⇓

| अवर सचिव (अर्थसंकल्प) | अवर सचिव (गृहव्यवस्थापन) | अवर सचिव (आस्थापना) |
|---|---|---|
| ⇓ | ⇓ | ⇓ |
| कक्ष अधिकारी (आस्था-१) | कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा) | कक्ष अधिकारी (आस्था-२) |
| कक्ष अधिकारी (भाषा-२) | कक्ष अधिकारी (रोख शाखा) | कक्ष अधिकारी (भाषा-३) |
| कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) | कक्ष अधिकारी (भाषा-१) | |

## मराठी भाषा विभाग

## कर्मचारी विषयक गोषवारा

Personnel Summary

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी Scale of Pay (३) | पदसंख्या (४) | Designation (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १ | सचिव | संवर्ग पद (भा.प्र.से.) | १ | Pr. Secretary/Secretary |
| २ | सह/उप सचिव | एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Joint Secretary/ Deputy Secretary |
| ३ | अवर सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | ३ | Under Secretary |
| ४ | कक्ष अधिकारी | एस-१७ : ४७६००-१५११०० | ८ | Section Officer |
| | | **एकूण (अ)** | **१३** | Total (A) |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | २ | Stenographer (H.G.) |
| २ | सहायक कक्ष अधिकारी | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ९ | Assistant |
| ३ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | २ | Stenographer (L.G.) |
| ४ | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | १० | Clerk-*cum*-Typist |
| ५ | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ब)** | **२५** | Total (B) |
| **(क) अराजपत्रित (वर्ग-४)** (C) Non-Gazetted (Class-IV) | | | | |
| १ | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ८ | Peon |
| | | **एकूण (क)** | **८** | Total (C) |
| **एकूण (अ+ब+क)** | | | **४६** | Grand Total (A+B+C) |

## कार्यक्रम क्रमांक ३

## भाषा संचालनालय

दि.१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.६.जुलै, १९६० अन्वये भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. शासनाला प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी सहाय्य आणि सल्ला देण्यासाठी भाषा सल्लागार मंडळ (सध्याची भाषा सल्लागार समिती) घटित करण्यात आले. समितीने विविध विषयांतील शब्दांबाबत मराठीतील परिभाषेसंदर्भात (Terminology) दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांचे परिभाषा कोश (Glossary) तयार करणे, विविध प्रशासकीय संज्ञा/पदनामे ठरविणे, त्याचप्रमाणे प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी मार्गदर्शक पुस्तकांची निर्मिती करणे इत्यादी कामे भाषा संचालनालयामार्फत करण्यात येत असून, शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भाषा संचालनालयाद्वारे पुढील कामे व जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात :-

**(१) राज्य कायदे व नियमांचे मराठीकरण** :-

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक.ओएलएफ-१०९५/७३७/प्र.क्र.३६/९५/२० ब, दिनांक १४ ऑगस्ट १९९५ अन्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ चे कलम ५ अंमलात आले असून त्यानुसार १५ ऑगस्ट १९९५ पासून राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके, राज्य विधानमंडळाने संमत करावयाचे सर्व अधिनियम, माननीय राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश तसेच, त्याखाली अधिसूचना, आदेश, नियम, विनियम, परिनियम व उपविधी मूळ स्वरूपात मराठीत करणे बंधनकारक केले असून, त्यांच्या मराठीतील मसुद्यांस मूळ मसुदा म्हणून समजले जाते.

कायदे व नियमांचे मसुदे मूलत: मराठीत तयार करण्याची यंत्रणा उपलब्ध नसल्याने, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६५ च्या कलम ५ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, भाषा संचालनालयाद्वारे खालील विधिविधानांचा व दुय्यम विधिविधानांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी केली जाते आणि तद्नुषंगिक कामे व जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात :-

(अ) राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके.

(ब) राज्य विधानमंडळाने संमत केलेले अधिनियम.

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये माननीय राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश.

(ड) केंद्रीय व राज्य अधिनियमांखालील सर्व अधिसूचना, आदेश, नियम, विनियम, परिनियम, उपविधी.

**(२) राज्य अधिनियमांचे मराठीकरण :** सन २०२३-२४ या वर्षांमध्ये एकूण १४ अध्यादेश, ४७ विधेयके, ०४ विधानमंडळ ठराव, इत्यादी वैधानिक प्रकरणांचे मराठीकरण केले असून मराठी अनुवाद केलेली काही ठळक प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

**विधानसभा/विधान परिषद विधेयके** :

**(१)** महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक, २०२२.

**(२)** महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२२.

**(३)** जेएसपीएम विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२.

**(४)** महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२२.

**(५)** महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३.

**(६)** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(७)** महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे विधेयक, २०२३

**महाराष्ट्र अध्यादेश :**

**(१)** महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०२२.

**(२)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२२.

**(३)** महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२

**(४)** महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०२३.

सन २०२३-२४ या वर्षामध्ये विधीमंडळाची जेवढी अधिवेशने पार पडतील त्यानुसार वेळोवेळी येणारे अध्यादेश, विधेयके, विधानमंडळ ठराव अशा वैधानिक प्रकरणांचा तातडीने अनुवाद करून देणे अपेक्षित आहे. सदर कार्यासनात कोणत्याही प्रकारे प्रलंबित कामे न ठेवता तातडीने अनुवादाची कामे करून दिली जातात. त्यामुळे सन २०२३-२०२४ या वर्षामध्ये संबंधित शाखेची संपूर्ण कामे करून देण्याचे प्रस्तावित आहेत.

**(३) नियमांचे मराठीकरण :** सन २०२३-२४ या वर्षामध्ये एकूण ५९ नियम, ०१ परिनियम, ८५ अधिसूचना, ०८ आदेश इत्यादी दुय्यम विधिविधानविषयक प्रकरणांचे मराठीकरण केले असून मराठी अनुवाद केलेली काही ठळक प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

**(१)** सामाजिक सुरक्षा संहिता, २०२१.

**(२)** महाराष्ट्र वक्फ नियम, २०२२.

**(३)** महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती (कामगार) नियम, २०२२.

**(४)** महाराष्ट्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातील पदांचे सेवाप्रवेश नियम, २०२२.

**(५)** महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य कामाची स्थिती (कारखाने व इतर बंदरे) नियम, २०२२.

**(६)** स्वयं-अर्थ सहाय्यित विद्यापीठ परिनियम, २०२२.

**(७)** विधीविधान शाखेतील अभिलेख ठेवण्याच्या कार्यपद्धती संबंधिचा आदेश, २०२२.

**(८)** मुद्रांकविषयक विविध नियम व आदेश.

सन २०२३-२४ या वर्षामध्ये नियम, परिनियम, अधिसूचना, आदेश अशा दुय्यम विधिविधानविषयक वैधानिक प्रकरणांचा तातडीने अनुवाद करून देणे अपेक्षित आहे. सदर कार्यासनात कोणत्याही प्रकारे प्रलंबित कामे न ठेवता तातडीने अनुवादाची कामे करून दिली जातात. त्यामुळे सन २०२३-२०२४ या वर्षामध्ये संबंधित शाखेची संपूर्ण कामे

करून देण्याचा प्रयत्न असेल. तथापि, भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेल्या विविध निवडणूकविषयक पुस्तकांचा तातडीने मराठी अनुवादाच्या कामामुळे सदर कार्यासनाचे संपूर्ण मनुष्यबळ त्या कामी वापरण्यात येत आहे.

**(४) राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण :-**

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने, सुधारणा अधिनियमांन्वये केलेल्या तरतुदींचा समावेश करून मूळ राज्य अधिनियम अद्ययावत करण्याचे आणि ते पुनर्मुद्रित प्रतींमध्ये (रिप्रिंट) पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे काम डिसेंबर, १९८३ पासून भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे. यामध्ये पुढील कामांचा समावेश होतो :-

**(अ)** राज्य विधानमंडळाने सुधारणा अधिनियमांन्वये केलेल्या तरतुदींचा समावेश करून मूळ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करणे.

**(ब)** अद्ययावत केलेले राज्य अधिनियम, पुनर्मुद्रित प्रतींच्या (रिप्रिंट) स्वरूपात प्रसिद्ध करणे.

**(क)** अद्ययावत करून पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध केलेले राज्य अधिनियम, भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर टाकणे (अपलोड करणे).

**(ड)** राज्य अधिनियमांचे एकत्रीकरण करून, ते महाराष्ट्र अधिनियम संहिता या स्वरूपात प्रसिद्ध करणे.

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाकडून नवीन राज्य अधिनियमांच्या निर्मितीबरोबरच मूळ राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याचे काम निरंतर केले जात असल्याने, राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून ते पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्याची प्रक्रियादेखील सतत चालू आहे. आजपर्यंत एकूण २७५ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून ते पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध केले आहेत आणि एकूण २५३ राज्य अधिनियम संकेतस्थळावर टाकलेले आहेत. अद्ययावतीकरण करण्यात येत असलेल्या राज्य अधिनियमांची सन २०२२-२३ या वर्षातील स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

**(अ)** अद्ययावतीकरण करून अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविले राज्य अधिनियम : ०६.

**(ब)** अद्ययावतीकरणाच्या विविध टप्प्यांवर असलेले राज्य अधिनियम:४७.

भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेल्या विविध निवडणूकविषयक पुस्तकांचा तातडीने मराठी अनुवादाच्या कामामुळे सदर कार्यासनाचे संपूर्ण मनुष्यबळ त्या कामी वापरण्यात येत आहे. त्यामुळे सन २०२३-२४ या वर्षांत राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे ०४ राज्य अधिनियम पाठविणे प्रस्तावित आहेत. त्याचप्रमाणे अद्ययावतीकरणाच्या विविध टप्प्यांवर असलेले ४७ राज्य अधिनियमांपैकी सुमारे ०४ अधिनियम पुस्तक स्वरुपात प्रकाशित करणेकामी अंतिम छपाईसाठी पाठविणे नियोजित आहे.

**(५) केंद्रीय अधिनियम व भारताचे संविधान यांचे मराठीकरण :**

**(अ) केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण :** यामध्ये पुढील कार्यप्रक्रियेचा समावेश होतो :-

(१) भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाच्या राजभाषा खंडाकडून प्राथम्य सूच्यांद्वारे नेमून दिलेल्या केंद्रीय अधिनियमांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करणे.

(२) मराठी अनुवाद केलेले केंद्रीय अधिनियम विधिक्षेकरिता (vetting) दिल्ली येथील राजभाषा खंडाकडे पाठविणे.

(३) मराठी अनुवाद केलेल्या केंद्रीय अधिनियमांवर राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाच्या बैठकीत चर्चा करणे व मान्यता घेणे.

(४) कार्यकारी गटाच्या बैठकीत सुचविलेल्या दुरूस्त्या व मान्य केलेले अर्थ पर्याय अंतर्भूत करून, केंद्रीय अधिनियम अॅझ्युअरलेड प्रतीच्या स्वरूपात मुद्रित करण्यासाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविणे.

(५) अॅझ्युअरलेड प्रतीच्या स्वरूपात मुद्रित केलेले केंद्रीय अधिनियम राजभाषा खंडामार्फत माननीय राष्ट्रपती महोदयांकडे अनुमतीसाठी पाठविणे.

(६) माननीय राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळालेले केंद्रीय अधिनियम, शासकीय मुद्रणालयामार्फत **Eभारताचे राजपत्रŠ** यामध्ये प्रसिद्ध करणे.

(७) **राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या केंद्रीय अधिनियमांची, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ अन्वये प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात छपाई करून, जनतेकरिता विक्रीसाठी शासकीय मुद्रणालयाच्या ग्रंथागारांमध्ये पुस्तक स्वरूपात उपलब्ध करून देणे तसेच भाषा संचालनालयाच्या व राजभाषा खंडाच्या संकेतस्थळावर टाकणे.

ही प्रकिया सतत चालू असून आजमितीस मराठी अनुवाद केलेल्या एकूण ३८६ केंद्रीय अधिनियमांना, राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाने मान्यता दिलेली आहे आणि एकूण २०० केंद्रीय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिद्ध केलेले आहेत तर, ४४ केंद्रीय अधिनियम प्राधिकृत अनुवादाच्या स्वरूपात प्रसिद्ध केलेले आहेत. उर्वरित अधिनियम कार्यवाहीच्या विविध टप्प्यांवर आहेत.

**(ब) भारताच्या संविधानाचे मराठीकरण :** यामध्ये पुढील कार्यप्रक्रियेचा समावेश होतो :-

(१) संसदेने वेळोवेळी केलेल्या संविधान सुधारणा अधिनियमांमधील तरतुदींचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करून भारताचे संविधान अद्ययावत करणे.

(२) अद्ययावत केलेले भारताचे संविधान मुद्रितांसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठवणे.

(३) मुद्रित वाचन करून, भारताच्या संविधानाची मुद्रित प्रत, मान्येसाठी राजभाषा खंडाकडे पाठविणे.

(४) राजभाषा खंडाने सुचवलेल्या दुरूस्त्या अंतर्भूत केलेली भारताच्या संविधानाची मुद्रित प्रत, अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठवणे.

(५) भारताच्या संविधानाच्या छापील प्रती, जनतेकरिता शासकीय मुद्रणालयाच्या ग्रंथागारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध करून देणे तसेच भाषा संचालनालयाच्या व राजभाषा खंडाच्या संकेतस्थळावर टाकणे.

**(५)** ही प्रक्रियादेखील सतत चालू असून आजपर्यंत, मराठीकरण केलेल्या भारताच्या संविधानाच्या ७ आवृत्त्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून ७ वी आवृत्ती ही, इंग्रजी-मराठी स्वरूपातील द्विभाषी आवृत्ती आहे. ९९ ते १०५ व्या संविधान सुधारणा अधिनियमांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करून अद्ययावत केलेली भारताच्या संविधानाची द्विभाषी आठवी आवृत्ती मान्यतेसाठी व पडताळणीसाठी राजभाषा खंडाकडे पाठवलेली आहे. या प्रक्रियेस, काही वेळ जाणार असल्याने, जनतेच्या सोयीसाठी ९९ ते १०५ व्या संविधान सुधारणा अधिनियमांचा समावेश असलेल्या जोडपत्रासह भारताच्या संविधानाच्या द्विभाषी सातव्या आवृत्तीच्या १००० प्रतींची राजभाषा खंडाच्या खर्चाने छपाई करण्यात आली आहे.

**(६) नियमपुस्तिका आणि प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचे मराठीकरण : -**

शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, मंत्रालयीन विभाग व शासकीय कार्यालयांद्वारे वापरल्या जाणाऱ्या नियमपुस्तिका (Manuals) प्रमाण नमुने आणि प्रपत्रे यांचा मराठीत अनुवाद करून देण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

सन २०२३-२०२४ या वर्षांत अनुवाद व अनुवाद तपासणीचे व परिभाषा कोशांच्या रुजूवातीचे तसेच विविध शासकीय कार्यालयांकडून वापरल्या जाणाऱ्या नियमपुस्तिका आणि प्रपत्रे यांचा मराठी अनुवाद येण्याची शक्यता आहे. भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेल्या विविध निवडणूकविषयक पुस्तकांचा तातडीने मराठी अनुवाद करणे त्यामुळे सन २०२३-२०२४ या वर्षांत उपरोक्त कामांची अंदाजित फोलिओ संख्या २३,००० इतकी असेल.

**(७) प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचे मराठीकरण : -**

(अ) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६५ अन्वये शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करण्याच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांसह पुढील प्रकरणांचा मराठीत अनुवाद करण्याचे व अनुवाद तपासणीचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

(आ) केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम.

(इ) केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे.

(ई) मंत्रालयीन विभागांची अन्य प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणे.

(उ) विविध चौकशी समित्यांच्या व अभ्यास समित्यांचे अहवाल व कृती अहवाल.

(ऊ) भारतीय निवडणूक आयोगाचे निदेश, आदेश, नियम, आचारसंहिता व नियम पुस्तिका.

सन २०२३-२४ या वर्षात विविध मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करून दिलेला आहे. अलिकडील काळामध्ये मराठीकरण केलेली काही ठळक प्रशासकीय प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ संदर्भातील सादरीकरणाचे मराठीत भाषांतर करणे

२. महिला धोरण, २०१४ मध्ये सुधारणा करून तयार करण्यात आलेल्या महिला धोरणाचा मसुदा मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत.

३. टेक्स्ट कनेक्ट संबंधीचे वस्त्रोद्योग विभाग यांचे काम

४. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांचे (अनुदेशांचे) मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

५. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

   १. Checklist for Presiding officer-२०२३

   २. Handbook for Polling Agent

६. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांचे (अनुदेशांचे) मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Requisition of vehicles, premices etc. during conduct of election to Loksabha, Legislative Assembly, Legislative Councils elections of President of India and Vice President of India and bye election –reg.

२. Deployment of Micro ovserver in Pollinng stations and theirs duties reg.

७. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांचे (अनुदेशांचे) मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

i. Instructions on plummeting level of public discourse…….

ii. Disciplinary Proceedings against officials appointed for electi……

iii. Multiple civil (non-force) measures to keep watch on……….

iv. Use of vehicles during elections by political parties and candidates…..

v. Provision for "None of the Above" option…….

vi. Arrangements of counting centers for counting of votes for…..

vii. Arrangements of strong rooms for safe storage…….

viii. Procedure of counting of votes from EVM, VVPAT……….

८. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांचे (अनुदेशांचे) मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Checklist for Chief Electoral Officers, २०२३

२. Manual on District Election Mangement Planning, २०२३

३. Manual on Vulnerability Mapping, २०२३

४. Checklist for Sector Officers, २०२३

५. Handbook for Sector Officers, २०२३

९. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Manual of Force deployment in Elections, २०२३

२. Manual on Electorl Risk Management, २०२३

३. Handbook for Presiding Officer, २०२३

१०. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत

१. Dos and don'ts for Sector Officer

२. Dos and don'ts for Presiding Officer

३. Dos and don’ts for District Election Officer

४. Dos and don’ts for Returning Officer

११. मेरी माटी मेरा देश या उपक्रमाच्या इंग्रजी भाषेतील पीपीटीचे मराठीत भाषांतर करणेबाबत.

१२. आगामी सार्वत्रिक निवडणूक — २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Checklist for District Election Officer,२०२३

१३. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Making election campaign ecofriendly-consolidated instruction regarding.

२. Media Certification and Monitoring Commitees (MCMC), Pre-certification of advertisements and paid News- consolidated Instructions

१४. आगामी सार्वत्रिक निवडणूक, २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Checklist for last ७२ Hours to poll day

२. Manual of Force Multipliers and Civil Measures,२०२३

३. Handbook for Counting Agents,२०२३

४. SOP for last ७२ Hours

५. Handbook for Returning Officer,२०२३

१५. आगामी सार्वत्रिक निवडणूक — २०२४ भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त पुस्तिकांचे मराठीमध्ये भाषांतर करणेबाबत.

१. Checklist for Returning Officer,२०२३

२. Compendium of Instruction on Election Expenditure Monitoring-२०२३

३. Manual on Electronic Voting Machine-edition-८

१६. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जल जीवन अभियानांतर्गत “नल जल मित्र” या उपक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांचा अनुवाद करून मिळणेबाबत.

**(८) विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे मराठीकरण :-**

(**अ**) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०२ अन्वये वित्त विभागामार्फत राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनामध्ये सादर केल्या जाणाऱ्या पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी, सुधारणा, मुद्रित वाचन, अशी अंतिम मुद्रणापर्यंतची कामे तसेच, खर्चाच्या विवरणपत्रात आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी शुद्धिपत्र तयार करण्याचे काम आणि मा. वित्त मंत्र्यांच्या भाषणावर व्याकरणिक व भाषिक संस्कार करण्याची कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :

(१) खर्चाचे पूरक विवरणपत्रे.

(२) अर्थसंकल्पविषयक निवेदन.

(३) अर्थसंकल्पीय अंदाज.

(४) अधिक खर्चाचे विवरणपत्र.

(५) नवीन बाबींचे विवरणपत्र.

सन २०२३-२०२४ या वर्षात पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करण्याचे आणि त्याच्या अंतिम मुद्रणापर्यंतची कामे पार पाडलेली आहे.

(१) खर्चाचे पूरक विवरणपत्र, २०२३-२०२४, (जुलै, २०२३ व डिसेंबर, २०२३), (मार्च, २०२४)

(२) नवीन बाबींचे विवरणपत्र, (मार्च, २०२४) अर्थसंकल्पविषयक निवेदन, २०२३-२०२४

**(९) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षा अहवालांचे मराठीकरण :-**

**(अ)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत मा. राज्यपालांना सादर केल्या जाणाऱ्या व दरवर्षी विधानमंडळात मांडल्या जाणाऱ्या पुढील अहवालांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी व मुद्रित वाचन, इत्यादी कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :

(१) वित्तीय लेखा.

(२) विनियोजन लेखा.

(३) लेख्यांवरील ओझरता दृष्टीक्षेप.

उपरोक्त अहवालांपैकी, पुढील अहवालांचे मराठीकरण करण्यात आले.

(१) वित्तीय लेखा, २०२२-२३ इ.पृ. ४५५

(२) विनियोजन लेखा, २०२२-२३ इ.पृ. ७५१

(३) लेख्यावरील ओझरता दृष्टीक्षेप, २०२२-२३ **इ. पृ.४९**

**(१०) परिभाषा व शद्बकोश निर्मिती कार्य :-**

(अ) शासन व्यवहारात व न्याय व्यवहारात आणि शालेय व विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमात मराठीचा वापर करण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व शास्त्रीय विषयांचे परिभाषा कोश व शद्बकोश तयार करण्याचे व अद्ययावत करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे.

(ब) परिभाषा निर्मिती व कोश निर्मिती हे कार्य संशोधन व अकादमिक स्वरूपाचे आहे.

(क) विविध विषयतज्ज्ञांचा समावेश असलेल्या भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पूर्वी करण्यात आले. आता भाषा सल्लागार समितीच्या मार्गदर्शनाखाली व संबंधित विषयांच्या तज्ज्ञांची उप समिती घटित करून नवीन परिभाषा कोश निर्मितीचे व पूर्वीच्या कोशांमध्ये सुधारणा करून त्यांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरू आहे.

(ड) तसेच जनतेच्या मागणीनुसार, कोश/ परिभाषा कोश व लघुपुस्तिका यांचे स्कॅन करून/ मुद्रित स्वरूपात पुनर्मुद्रण करण्याचे कामदेखील नियमितपणे चालू आहे.

**भाषा संचालनालयाने तयार केलेले परिभाषा कोश, शद्बकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका** भाषा संचालनालयाची एकूण ५२ प्रकाशने असून त्यात पुढील प्रकाशनांचा समावेश आहे :—

**१) भारताचे संविधान :-**

**२) शद्बकोश ४ :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास व न्याय व्यवहारास उपयुक्त असलेले पुढील कोश प्रसिद्ध केलेले आहेत :

| | | | |
|---|---|---|---|
| १) शासन व्यवहार कोश | २) प्रशासन वाक्प्रयोग | ३) पदनाम कोश | ४) न्यायव्यवहार कोश |

**३) शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास उपयोगी असलेल्या पुढील मार्गदर्शक पुस्तिका व ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत :—

| | | | |
|---|---|---|---|
| १) प्रशासनिक लेखन | २) राजभाषा परिचय | ३) कार्यदर्शिका | ४) मराठी लघुलेखन मार्गदर्शिका |
| ५) शासन व्यवहारात मराठी | ६) मराठी टंकलेखन प्रवेशिका | ७) प्रमाणलेखन नियमावली | ८) मंथन |
| ९) मराठी लघुलेखन | १०) राजभाषा परिचय व कार्यरुप व्याकरण | ११) संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका | १२) शासन व्यवहार नित्योपयोगी लघुपुस्तिका |

**४) परिभाषा कोश-२९**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश | १६ | शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश |
| २ | गणितशास्त्र परिभाषा कोश | १७ | राज्यशास्त्र परिभाषा कोश |
| ३ | समाजशास्त्र परिभाषा कोश | १८ | साहित्य समीक्षा परिभाषा कोश |
| ४ | तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | १९ | लोकप्रशासन परिभाषा कोश |
| ५ | वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | २० | अर्थशास्त्र परिभाषा कोश |
| ६ | रसायनशास्त्र परिभाषा कोश | २१ | धातुशास्त्र परिभाषा कोश |
| ७ | भूशास्त्र परिभाषा कोश | २२ | मानसशास्त्र परिभाषा कोश |
| ८ | शारीर परिभाषा कोश | २३ | व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश |
| ९ | शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | २४ | संख्याशास्त्र परिभाषा कोश |
| १० | यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश | २५ | औषधशास्त्र परिभाषा कोश |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश | २६ | भूगोलशास्त्र परिभाषा कोश |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | भौतिकशास्त्र परिभाषा कोश | २७ | वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश |
| १३ | विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश | २८ | न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश |
| १४ | कृषिशास्त्र परिभाषा कोश | २९ | भाषाविज्ञान व वाड्.मयविद्या परिभाषा कोश |
| १५ | जीवशास्त्र परिभाषा कोश | | |

**(५) शब्दावल्या-६**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वित्तीय शब्दावली | ४ | कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| २ | शासन व्यवहार शब्दावली | ५ | विकृतीशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| ३ | भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली | ६ | वाणिज्यशास्त्र पारिभाषिक शब्दावली |

**(६) विविध उप समित्यांमार्फत सुरू असलेल्या परिभाषा कोशांच्या कामकाजाची सद्य:स्थिती :—**

परिभाषा कोशांमध्ये व शब्दकोशांमध्ये सुधारणा करून त्यांचे पुनर्मुद्रण करण्याचा प्रकल्प :—

**(१)** शासन व्यवहार कोश-शासन व्यवहार कोश (सुधारित) उपसमितीच्या बैठका पूर्ण झाल्या असून तत्कालीन मा. मंत्री मराठी भाषा यांच्या आदेशानुसार सुलभीकरण्याच्या दुष्टीने काम सुरू आहे. शासन व्यवहारकोश (सुधारित) याचे दुसरे मुद्रित कार्यालयास प्राप्त झाले आहे.

**(२)** कृषिशास्त्र परिभाषा कोश (सुधारित) उप समितीच्या बैठका सुरू असून नव्याने प्राप्त झालेल्या अंदाजे २०,००० संज्ञांवर चर्चा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**(३)** अर्थशास्त्र परिभाषा कोश (सुधारित)उप समितीचे काम पूर्ण झाले असून सदर कोशाचे दुसरे मुद्रित कार्यालयास प्राप्त झाले आहे.

**(४)** तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोशाचे (सुधारित) उपसमितीचे काम पूर्ण झाले असून या कोशांना पहिले मुद्रित कार्यालयास प्राप्त झाले आहे.

**(५)** स्थापत्यशास्त्र परिभाषा कोशाचे दुसरे मुद्रित कार्यालयास प्राप्त झाले आहे.

**(६)** शासन व्यवहार कोश (सुधारित) उपसमितीकडे सुलभीकरणाचे काम सोपवले आहे. ते अंतिम टप्प्यावर आहे.

संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान आणि पर्यावरणशास्त्र या २ नवीन परिभाषा कोशांना मान्यता घेण्यासाठी मराठी भाषा विभागाकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

(११) **भाषा संचालनालयाची प्रकाशने संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबतची सद्य:स्थिती : —**

भाषा संचालनालयाचे परिभाषा कोश व अन्य प्रकाशने ई-पुस्तकाच्या स्वरूपात भाषा संचालनालयाच्या http://directorate.marathi.gov.in या संकेतस्थळाअंतर्गत असलेल्या https://shabdakosh.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

**(१२) शासन व्यवहारात मराठीचा वापर (शासकीय कार्यालयांची तपासणी) :—**

अ) राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे अनिवार्य केलेले असल्याने, शासन व्यवहारात मराठीचा वापर केला जातो किंवा कसे यादृष्टीने महाराष्ट्रातील मंत्रालयीन विभाग आणि शासकीय व निम-शासकीय कार्यालये यांची तपासणी करणे, त्यासंबंधातील अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे आणि करावयाच्या उपाययोजनासंबंधी शासनाकडे अहवाल पाठविणे, इत्यादी कामे भाषा संचालनालयामार्फत केली जातात.

ब) मुख्यालय स्तरावर भाषा संचालक व विभागीय स्तरावर विभागीय सहायक भाषा संचालक यांच्या नेतृत्वाखालील तपासणी पथकाद्वारे शासकीय कार्यालयांची तपासणी केली जाते.

क) आतापर्यंत राज्यातील सुमारे १०७८ शासकीय व निमशासकीय कार्यालयांची आणि ११ मंत्रालयीन विभागांची तपासणी केली आहे.

**१३) भाषाविषयक परीक्षा** भाषा संचालनालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या पुढील परीक्षा घेण्याची संपूर्ण जबाबदारी भाषा संचालनालय पार पाडत आहे. या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. सदर परीक्षा पुढीलप्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | परीक्षा | परीक्षेचा दिनांक | परीक्षेस बसलेले उमेदवार |
|---|---|---|---|
| १ | मराठी भाषा (राजपत्रित) परीक्षा. | जुलै, २०२३ | २९८ |
| | | जानेवारी २०२४ | अंदाजित ३०० |
| २ | मराठी भाषा (अराजपत्रित) परीक्षा. | जून, २०२३ | २८४ |
| | | डिसेंबर २०२३ | ३९३ |
| ३ | हिंदी भाषा परीक्षा | जून, २०२३ | १०४३ |
| | | डिसेंबर २०२३ | अंदाजित १००० |
| ४ | मराठी टंकलेखन परीक्षा. | एप्रिल, २०२३ | १२७ |
| | | ऑक्टोबर, २०२३ | ६३ |
| ५ | मराठी लघुलेखन परीक्षा. | एप्रिल, २०२३ | ४३ |
| | | ऑक्टोबर, २०२३ | १४ |

सन २०२३-२०२४ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत मराठी भाषा, हिंदी भाषा, टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी एकूण १८७२ उमेदवार बसले होते.

भाषा संचालनालयाचे माहिती http://directorate.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच संचालनालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेले विविध परिभाषा कोश/शद्बकोश यातील माहिती एकत्रितपणे https://shabdakosh.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

-----------------

## भाषा संचालनालय

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| १ | भाषा संचालक | एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Director of Languages |
| २ | भाषा उप संचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Translation & Terminology) |
| ३ | भाषा उप संचालक (विधि) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Legal) |
| ४ | विभागीय सहायक भाषा संचालक | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ८ | Divisional Assistant Director of Languages |
| ५ | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ८ | Assistant Director of Languages (Translation & Terminology) |
| ६ | सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Director of Languages (Training & Establishment) |
| ७ | भाषा अधिकारी (हिंदी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Language Officer (Hindi) |
| | | **एकूण (अ)** | **१३** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| ८ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Marathi Stenographer (H.G.) |
| ९ | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ७ | Superintendent |
| १० | पर्यवेक्षक (मराठी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ९ | Superviser (Marathi) |
| ११ | पर्यवेक्षक (हिंदी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superviser (Hindi) |
| १२ | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| १३ | अनुवादक (मराठी) | एस-१३ : ३५४००-११२४०० | ४२ | Translator (Marathi) |
| १४ | अनुवादक (हिंदी) | एस-१३ : ३५४००-११२४०० | ४ | Translator (Hindi) |
| १५ | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५५००-८११०० | १० | Senior Clerk |
| १६ | मराठी लघुटंकलेखक | एस-८ : २५५००-८११०० | १ | Steno-Typist (Marathi) |
| १७ | लिपिक-टंकलेखक (मराठी/ इंग्रजी) | एस-६ : १९९००-६३२०० | १८ | Clerk-Typist (Marathi) |
| १८ | कनिष्ठ ग्रंथपाल | एस-७ : २१७००-६९१०० | १ | Junior Librarian |
| १९ | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ब)** | **९७** | **TOTAL (B)** |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| २० | नाईक | एस-३ : १६६००-५२४०० | २ | Naik |
| २१ | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | १५ | Peon |
| | | **एकूण (क)** | **१७** | **TOTAL (C)** |
| **एकूण (अ + ब + क)** | | | **१२७** | **GRANT TOTAL(A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक ४

## राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे, १९९२ रोजी 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली. 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' आणि 'सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' याअन्वये दिनांक २ जानेवारी, १९९३ रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक १ मार्च, १९९३ पासून स्थापनेनंतर जवळजवळ दहा महिन्यांनी संस्थेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली. तेव्हापासून आतापर्यंत संस्था मराठी भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

**संस्थेची उद्दिष्टे :**

विविध क्षेत्रात होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहणे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करणे ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेते. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या सहाय्यानेही काही उपक्रम संस्था पार पाडते.

**प्रशासकीय व्यवस्था :**

संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार चालते. संस्थेचे कार्यक्रम/ उपक्रम/ प्रकल्प यांचे अग्रक्रम ठरविण्यासाठी नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार एक उपक्रम समिती आहे. आर्थिक बाबी विचारात घेण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक वित्त समिती आणि संस्थेचे आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी तसेच, संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक कार्यकारी समिती नेमण्यात आली आहे. संस्थेच्या विविध कार्यासाठी या कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक असते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री हे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत.

**संस्थेचे कार्य :**

संस्थेने आपल्या उद्दिष्टांना अनुसरून स्थापनेपासून विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले आहेत.

**(अ) चर्चासत्रे :**

आजपर्यंत विविध विषयांवर २५ हून अधिक राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**(ब) काही महत्त्वपूर्ण प्रकाशने :** मराठी भाषेच्या विकासाला पूरक असे माहितीकोश, संकल्पनाकोश, सूची, माहितीपुस्तिका, कार्यपुस्तिका, वैचारिक, संशोधनात्मक लेखन, मराठी साहित्यकृतींची हिंदी भाषांतरे अशी विविधांगी पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यापैकी काही उल्लेखनीय प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत :—

**(१) भाषाविषयक :**

**(अ) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम** - (संपादन - रमेश पानसे) - जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काय करणार ? ना देश, ना गोत, ना राष्ट्र असे आम्हांस व्हावयाचे आहे काय ?, या मौलिक आणि मूलभूत प्रश्नाला भिडणारे, मराठीच्या शिक्षणक्रमाशी संबंधित असलेले एक जुने (१९०६) चिरतरुण पुस्तक.

**(ब) मराठी भाषा : वाढ आणि बिघाड** - (श्री. के. क्षीरसागर) मराठी बोलताना आणि तिच्यातून लेखनव्यवहार पार पाडताना सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे-जे प्रश्न घुटमळत आहेत, त्यांचा मुक्त मनाने घेतलेला परामर्श.

**(क) महाराष्ट्राचा भाषिक नकाशा-पूर्वतयारी** - (प्रमुख संशोधक - डॉ. रमेश धोंगडे / संशोधन समन्वयक आणि संशोधक साहायक - डॉ. अशोक सोलनकर) प्रमाण मराठी, बोली, उपभाषा, आदिवासींच्या भाषा, मिश्रभाषा इत्यादिंचे विविध भाषिक अविष्कार, त्यांची प्रदेशानुसार नकाशाद्वारे मांडणी करून महाराष्ट्रातील भाषांची वैविध्यपूर्ण माहिती देणारा ग्रंथ.

**(२) कोश व सूची वाङ्मय -**

**(अ) कोश व सूची वाङ्मय : स्वरुप आणि साध्य** - (संपादन - सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन) बी. ए., एम. ए. चे मराठी विषयाचे विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्र विद्यार्थी तसेच संशोधनपर लेखन करू इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त. संस्कृत-इंग्रजी-मराठी भाषांतील वैविध्यपूर्ण कोश व सूची वाङ्मयाचा सांगोपांग परिचय करून देणारा ग्रंथ.

**(ब) शालेय मराठी शब्दकोश** - (वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके) इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्यप्रचार आदिंची सचित्र व सोदाहरण ओळख. मराठी अभ्यास परिषदेतर्फे दिले जाणारे मराठी भाषाविषयक लेखनाचे महाबँक पारितोषिक १९९९. आजपर्यंत या कोशाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(क) विज्ञान संकल्पना कोश** - (प्रा. रा. वि. सोवनी) इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्रातील संकल्पना सुबोध मराठीतून उलगडून सांगणारा कोश. (मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने)

**(ड) मराठी लघुलेखन शब्दकोश** - (व. वा. इनामदार) मराठी लघुलेखनाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांना सरावासाठी उपयुक्त ठरलेला लघुलेखनविषयक एकमेव ग्रंथ. ना. गो. कालेलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार १९९५-९६.

**(इ) दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश व विधीकोश** - (संपादक - डॉ. गंगाधर पानतावणे) याकरिता इ. स. १८१८ ते २००५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या साहित्यातून दलित-ग्रामीण जीवनानुभव व्यक्त झाले आहेत असे साहित्य या शब्दकोशासाठी आधारभूत मानले आहे. आजवर शब्दकोशाचे तीन खंड व विधीकोशाचा १ खंड असे एकूण ४ खंड प्रकाशित.

**(३) शैक्षणिक :-**

**(अ) मराठी लेखन मार्गदर्शिका :** (यास्मिन शेख) - सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, भाषा शिकणाऱ्या अन्य भाषक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखक, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी अशा सर्वांना मराठीत लेखन करण्यासाठी बिनचूक मार्गदर्शन करणारे उपयुक्त पुस्तक. आजपर्यंत या कोशाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(ब) प्रशासनिक मराठी भाषेचा विकास** - (गीता भागवत) प्रशासनिक लेखन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर सूचनांसह, प्रशासनिक मराठीच्या वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास.

**(क) इतर उपक्रम :-**

**(१) इतर राज्यांतील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत व भारतातील विविध राज्यांतील व जगातील अनेक देशांतील मराठी भाषकांसाठी उपक्रम :** मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात इत्यादि राज्यांतील शाळांना महत्त्वाची पुस्तके पाठवण्याचे काम संस्था करीत आहे. सन १९९४ पासून संस्थेने आंध्रप्रदेशातील महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद यांना व त्यांनी सुचविलेल्या शाळांतील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बालभारती, कुमारभारती, युवकभारती अशी मराठीची पाठ्यपुस्तके पाठविण्यात येतात. महाराष्ट्र मंडळ ही पुस्तके विद्यार्थी प्रतिष्ठान महाराष्ट्र मंडळ (आंध्रप्रदेश) यांच्यामार्फत संबंधित शाळांना वितरित करीत असते. तसेच, गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील मराठी मंडळांच्या शाळांना दैनिक लोकसत्ता, पुणे सकाळ ही वर्तमानपत्रे व नियतकालिके पाठविण्यात येतात.

**(२) बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य योजना :** महाराष्ट्र शासनाने सन २०१० मध्ये स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ "भाषा आणि साहित्य" याअंतर्गत बृहन्महाराष्ट्र या विभागात उल्लेखिल्यानुसार महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात आणि महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसाहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील "अन्य राज्यात व परदेशात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे" ह्या उद्दिष्टाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत राबविण्यात येणारी ही योजना शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दिनांक १३ जून, २०१६ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेकडे हस्तांतरित केली आहे. या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था/मंडळे यांना विहित कार्यपद्धतीनुसार एका संस्थेला जास्तीतजास्त २ लाख तर एकूण ५० लाख रुपयांच्या मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून आजवर संस्थेच्या विहित कार्यपद्धतीने एकूण ८७ मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

**(३) महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी मंडळे व संस्थांसाठी अर्थसाहाय्य योजना** - महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्ध होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थांना अर्थसाहाय्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १४ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना/मंडळांना सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीच्या अधीन राहून अर्थसहाय्य/ अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसहाय्य हा नवीन उपक्रम म्हणून मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त राज्य मराठी विकास संस्था यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे.

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक कसायो-१०१२/प्र.क्र.१३९/२०१२/भाषा-३, दि.२१.०१.२०१३ अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषेचा विकास, सर्वधन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे एक खास बाब म्हणून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थांना शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याऱ्या / पात्र ठरणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. राज्य मराठी विकास संस्थेकडून सन २०२२-२३ या वर्षापासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास अर्थसहाय्य ही योजना कार्यन्वित करण्यात येत आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५

गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होणाच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थासाठी १ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

राज्य मराठी विकास संस्थेने या योजनेअंतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त पात्र संस्थांना/मंडळांना रु. १०.०० लक्षच्या कमाल मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.

(४) **मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा** - बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली ही संस्था गेली ३० वर्षे मराठी भाषा, संस्कृती व सामान्य ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा आयोजित करते. बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सन २०१८ पासून सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. प्रतिवर्ष रु. ९,००,००० इतक्या खर्चास मान्यताप्राप्त झालेली आहे.

(५) **वाचन प्रेरणा दिन** : भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सन २०१५ पासून दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

सन २०२३च्या निमित्ताने राज्य मराठी विकास संस्थेने "जागर मराठीचा" हा दोन दिवसीय आभासी कार्यक्रम दि. १४ व १५ ऑक्टोबर २०२३ रोजी, "माझी मराठी'" लेख स्पर्धा, तसेच, "शिवरायांचे आठवावे रूप" व "बोलतो मराठी" या दोन प्रत्यक्ष कार्यक्रमांचे दि. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी (दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई) आयोजन करण्यात आले होते.

(६) **मराठी भाषा गौरव दिन** : शासनाच्या धोरणानुसार कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी मराठी भाषा विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

२७ फेब्रुवारी, २०२३ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेच महाराष्ट्रासाठी योगदान, मराठी भाषा जागृत ठेवण्यासाठी केले गेलेले प्रयत्न, तमाशा, नाटक, सिनेमा यातून फुलत गेलेली व जागृत राहिलेली मराठी भाषा विविध बोली भाषा तसेच, प्रहसनाच्या माध्यमातून मराठी भाषा अभिजात भाषेत सामिल होण्यासाठी आघाडी सरकारने चालवलेले तळमळीचे प्रयत्न, इत्यादी निवेदन, संगीत, विनोदी स्कीस्ट, नाट्य, गाणी आणि माहितीपटाच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रवास दर्शविणारा आणि मराठी भाषेची सौंदर्यस्थळे उलगडणाऱ्या Èऐसी अक्षरे रसिकेÉ ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**(७) मराठी भाषा पुरस्कार** -

शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि. १८ फेब्रुवारी २०१६ अन्वये सन २०१६ पासून "अशोक रा. केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार" आणि "मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार" हे दोन नवीन पुरस्कार मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेकरिता सुरू करण्यात आले आहेत. मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी सदर पुरस्कारांचे वितरण राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात येते.

या पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रु. २,००,००० (रु. दोन लाख फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

मराठी भाषेचा अधिक प्रसार व प्रचार व्हावा याद्दष्टीने सदर दोन्ही पुरस्कार सन २०२१ पासून व्यक्ती आणि संस्था यांना स्वतंत्रपणे देण्याचा निर्णय घेण्यात आला असून दि. २४.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत मंत्रीमंडळाने वरील दोन ऐवजी चार पुरस्कार (दोन व्यक्ती व दोन संस्था यांना) सन २०२१ या वर्षापासून प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

सन २०२२ या वर्षी "अशोक केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार" डॉ. विठ्ठल वाघ (व्यक्ती) व महाराष्ट्र साहित्य परिषद (संस्था) यांना व "मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार" डॉ. द. ता. भोसले (व्यक्ती) व कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी (संस्था) यांना दि.२७ फेब्रुवारी, २०२३ रोजी मराठी भाषा गौरव दिनी प्रदान करण्यात आले आहेत.

**८) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :-**

दि. १४ जानेवारी २०२३ ते दि. २८ जानेवारी २०२३ ह्या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मराठीतील विविध साहित्यप्रकार, आणि साहित्यक्षेत्रे ह्यांत आपले योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी साहित्य कट्टा या कार्यक्रमाचे महाजालीय स्वरूपात आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मिती क्रिएशन्स ह्यांच्या सहयोगाने मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त भाषा भरजरी....तिचा उत्सव जरतारी कार्यक्रमांतर्गत "साहित्य कट्टा" या महाजालीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन सदर कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण राज्य मराठी विकास संस्था, मिती क्रिएशन्स आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या यूट्यूब वाहिनवर करण्यात आले. **https://rmvs.marathi.gov.in/३०५८**

**९) अभिजात मराठी भाषा दालन :-**

अभिजात मराठी भाषेच्या दालनामध्ये प्रामुख्याने मराठीच्या प्राचीनत्वाची मांडणी करणारी उदाहरणे, मराठीचे भाषिक आणि कालिक भेद दर्शविणारा आढावा, मराठीतील उपलब्ध आणि अधिकृत शिलालेखांच्या प्रतिकृती, मराठीच्या मध्ययुगीन वैभवाची मांडणी, बहमनीकाळ ते शिवकालीन आणि पेशवेकालीन मराठी, एकोणिसाव्या शतकातील मराठी, आधुनिकता आणि मराठी, मराठी साहित्यपरंपरेचे दालन अशा दोन हजार वर्षापूर्वीच्या मराठी भाषेच्या प्रवासासंबंधी माहिती देणाऱ्या विविध सबळ पुराव्यांचे आणि त्याच्याशी संबंधित शिलालेखांच्या प्रतिकृती, ताम्रपट, नाणी, भाषेचे टप्पे, विविध वाड्मयप्रकार, काही निवडक गाथा, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेख, साहित्य यांच्या प्रतिकृतींचे या प्रदर्शनात १३ विविध दालने उभारण्यात आली होती. त्यासंबंधित शांतता...मराठीचे कोर्ट चालू आहे ! या लघुपटाचे खेळ आयोजित करण्यात आले होते. तसेच, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा यासाठी विनंती करणारी पत्रे दालनास भेट देणाऱ्या साहित्यिक, लोक प्रतिनिधी, मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी आणि सर्वसामान्य जनता यांच्या सहीने राष्ट्रपती महोदयांना पाठवण्यात आली आहेत.

सदर अभिजात मराठी भाषेचे दालन ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक, विधानभवन, त्रिमुर्ती प्रांगण, मंत्रालय आणि ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर येथे उभारण्यात आले होते.

तसेच, ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन शुक्रवार दि. ३ फेब्रुवारी २०२३ ते रविवार दि. ५ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत स्वावलंबी शाळा, वर्धा येथे करण्यात आले होते. सदर संमेलनात मराठी भाषा विभागातर्फे "अभिजात मराठी भाषा दालन" उभारण्यात येऊन उपरोक्त कालावधीत सदर दालनात मराठी

भाषा ही किमान दोन हजार वर्षापूर्वीची भाषा असून, त्याबाबतच्या सबळ पुराव्यांचे आणि त्याच्याशी संबंधित शिलालेखांच्या प्रतिकृती, नाणी, ताम्रपट, प्राचीन ग्रंथांमधील उल्लेख, भाषेचे टप्पे, निर्माण झालेले विविध वाङ्मयप्रकार, महत्त्वाचे प्रमुख ग्रंथ यांच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन मांडण्यात येऊन त्यासंबंधीत "शांतता! मराठीचे कोर्ट चालू आहे" ह्या लघुपटाचे सलग तीन दिवस खेळ आयोजित करण्यात आले.

## संस्थेत सुरू असलेले/पूर्ण झालेले उल्लेखनीय प्रकल्प :

### (१) अ) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची :

दलित आणि ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे असे दोन प्रवाह आहेत. अपरिचित शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्यप्रयोग यामुळे हे साहित्य काही प्रमाणात वाचकांच्या दृष्टीने दुर्बोध राहिले आहे. लोकजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांशी निगडित अशा दलित-ग्रामीण साहित्यातील, शब्दांचा नेमका अर्थ सापडेल असा शब्दकोश आज मराठीत नसल्याने तसेच ह्या साहित्यामधून जे नवनवीन आणि अपरिचित शब्द मिळतात ते प्रमाण मराठी भाषेत येणे आवश्यक असल्याने असे शब्द विविध साहित्यकृतींमधून निवडून त्यांचे अर्थ तपशीलांसह या कोशात दिलेले आहेत. तो विशिष्ट शब्द असलेले साहित्यकृतीतील मूळ वाक्यही वाचकांच्या संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्ये दिलेले आहे. या कोशाचे तीनही खंड प्रकाशित झाले आहेत. दलित-ग्रामीण वर्णनात्मक सूचीचे काम चालू असून या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी नवीन संपादक मंडळ गठित करण्यात आले आहे.

### ब) दलित-ग्रामीण-साहित्य रूढी, प्रथा, परंपरा विधिकोश :

दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश या प्रकल्पाचाच हा एक भाग असून, त्यामध्ये दलित व ग्रामीण साहित्यकृतींमधून आलेल्या विविध जाती-जमातींच्या विधि, रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा, समजुती, सण-उत्सव, नवस-सायास, दैवत, लोकाचार इत्यादि विषयांच्या अनुषंगाने सांस्कृतिक संदर्भ असलेल्या अनेक संकल्पनांचे संकलन करून त्यांची सचित्र स्पष्टीकरणात्मक माहिती या कोशातून दिलेली असून, हा कोश प्रकाशित करण्यात आला आहे.

### (२) वस्त्रनिर्मिती-माहितीकोश :

वस्त्रोद्योगाची सर्वांगीण व अद्ययावत माहिती मराठी भाषेतून उपलब्ध करून देणारा "वस्त्रनिर्मिती माहितीकोश" हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्था आणि दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षण संस्था, इचलकरंजी यांनी संयुक्तपणे कार्यान्वित केला आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानामुळे भारतातील वस्त्रोद्योगाचा, वस्त्रनिर्मितीकलेचा विकास कसा होत गेला ते विकासाचे टप्पे, भारतीय वस्त्रोद्योगाचे आजवरचे स्वरूप त्याची वैज्ञानिक-तांत्रिक प्रगती, महाराष्ट्राचे या उद्योगामधील स्थान, होऊ घातलेले जागतिकीकरण या सर्वांचा साकल्याने विचार या कोशात करण्यात आला आहे. मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भात वस्त्रोद्योगाला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान आहे, परंतु या विषयासंबंधी फारच थोडे दर्जेदार लिखाण मराठी भाषेत उपलब्ध आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी सर्वसामान्य जिज्ञासूला समजेल अशी माहिती या कोशात देण्यात आली आहे.

या माहितीकोशाचे प्रकल्पांतर्गत एकूण अकरा खंड प्रस्तावित असून संस्थेने आतापर्यंत (१) खंड १ - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान, (२) खंड २ - सूतनिर्माण, (३) खंड ३ - कापडनिर्माण, (४) खंड ४ - रासायनिक प्रक्रिया, (५) खंड ५ - फॅशन व वस्त्रप्रावरणे (६) खंड ७-वस्त्रोद्योग व्यवस्थापन हे सहा खंड प्रकाशित झालेले आहेत.

वस्त्र माहितीकोश खंड : ०६ : तांत्रिक वस्त्रे, वस्त्र माहितीकोश खंड : ०८ : वस्त्र संकल्पनेचा सांस्कृतिक आविष्कार व वस्त्र. माहितीकोश खंड : ०९ : वस्त्रोद्योग परिभाषा कोश या तीन खंडांचे काम चालू आहे. वस्त्रनिर्मिती

माहितीकोश खंड : ०१ ते ०५ हे **https://rmvs.marathi.gov.in/२६** या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(३) मराठी ग्रंथसूचिमाला (१९५१-२०००) :**

कै. शं. ग. दाते यांनी सन १८०० ते १९५० पर्यंतच्या मराठी ग्रंथांची विषयवार सूची दोन भागात तयार केली होती. ही सूची बरीच वर्षे अनुपलब्ध असल्याने इ.स. २००० मध्ये संस्थेने तिचे नवीन परिशिष्टांसह पुनर्मुद्रण केले.

तसेच इ. स. १९५० नंतर मराठीमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची एकत्रित अशी विषयवार ग्रंथसूची उपलब्ध नसल्याने राज्य मराठी विकास संस्थेने 'मराठी ग्रंथसूचीमाला' हा प्रकल्प हाती घेतला असून त्याअंतर्गत इ. स. १९५१ ते २००० या कालखंडातील मराठी ग्रंथांची विषयवार सूची करण्यात येत आहे. आतापर्यंत या मालेतील चार भाग — भाग-३ (१९५१-१९६२), भाग-४(१९६३-१९७०), भाग-५ (१९७१-१९७८) आणि भाग-६ (१९७९-१९८५) - प्रकाशित करण्यात आले आहेत.

भाग-७ (१९८६-१९९०) या कालखंडातील हस्तलिखित नोंदी संगणकीकृत करून पूर्ण झालेल्या असून त्या विदागाराच्या स्वरूपात महाजालावर शोधसुकर स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

भाग-८ (१९९१-२०००) यामधील ग्रंथांच्या सूचीचे संपादकीय काम पूर्ण झाले असून, या नोंदीही लवकरच शोधसुकर पद्धतीने महाजालावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**(४) मराठी उत्तमोत्तम साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके (ऑडिओ सीडीज) :**

या प्रकल्पांतर्गत मराठीतील प्रसिद्ध निवडक संतसाहित्य तसेच, ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या साहित्यिकांचे साहित्य, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते साहित्य व महाराष्ट्र शासन पारितोषिक विजेते निवडक साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके तयार करण्यात येणार असून, आतापर्यंत कृष्णाकाठ (स्व. यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र) व श्री दासबोध (श्री समर्थ रामदास) या ग्रंथांची श्राव्य-पुस्तके तयार करण्यात आली असून, ती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच त्यांच्या ऑडिओ सीडीही संस्थेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांचे अनुक्रमे रसयात्रा व प्रवासी पक्षी आणि संहिता व आदिमाया ह्या कवितासंग्रहांची श्राव्य पुस्तके संस्थेच्या संकेतस्थळावर जनतेसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यात आली आहेत.

या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा व नामदेव गाथा या संतसाहित्याची बोलकी/श्राव्य पुस्तके तयार करण्यात येणार आहेत. त्यापैकी ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्याची प्रक्रीया अंतिम टप्प्यात असून, लवकरच हे श्राव्यपुस्तक संस्थेच्या संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**(५) तमिळ विद्यापीठ तंजावर मोडी प्रकल्प (तमिळ विद्यापीठ तंजावर येथील मोडी कागदपत्रांचे जतन, संवर्धन (प्रिझर्वेशन व कंझर्वेशन), संगणकीकरण (डिजिटायजेशन) व देवनागरी लिप्यंतर, भाषांतर व सूची करून ते प्रकाशित करणे) :-**

दक्षिण भारतामध्ये तमिळनाडू येथे इसवी सन १६७६ ते १८५५ या कालखंडापर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजी राजे भोसले व त्यांच्या वंशजांचे राज्य होते. या कालखंडातले समाज जीवन, इतिहास, त्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक धोरण. भाषा, साहित्य, संस्कृती, वैद्यकीय आदी विषयांची सर्व कागदपत्रे मोडी लिपीत उपलब्ध आहेत. त्यामुळे ही ऐतिहासिक माहिती मराठी भाषिकांना, अभ्यासकांना, संशोधकांना, वाचकांना उपलब्ध करणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

सदर प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात आतापर्यंत एकूण ५,८८,५०० इतक्या मोडी कागदपत्रांचे दोन टप्प्यात अनुक्रमे ३,७६,००० व २,१२,५०० कागदपत्रांचे जतन व संवर्धन करण्यात आले आहे. सदर कागदपत्रे ही जापानी पद्धत वापरून पुढील १०० ते २०० वर्षे टिकतील असे जतन व संवर्धन केले आहे. तसेच या सर्व कागदपत्रांचे संगणकीकरण करण्यात आले आहे. त्यांच्या एकूण १० लक्ष इमेजेस/फ्रेम्स तयार करण्यात आल्या असून त्या ३४ हार्डडिस्कमध्ये वेगवेगळ्या स्वरूपात साठविण्यात आल्या आहेत. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात मोडी कागदपत्रांचे विषयानुसार वर्गीकरण व सूचीकरण करण्यात येणार आहे.

**(६) अमराठी भाषकांसाठी उपक्रम : (मायमराठी)**

अमराठी भाषकांसाठी प्रकाशने ह्या पहिल्या भागांतर्गत अमराठी भाषकांना मराठी भाषेचे ज्ञान करून देण्यासाठी पाठ्यपुस्तके, शब्दकोश इ. निर्माण करणे तसेच, इतर प्रकाशने निर्माण करणे आणि दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडेल असे मराठी भाषेचे शिक्षण देणे अभिप्रेत आहे.

या दृष्टीने मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने हाती घेतलेल्या "माय मराठी" प्रकल्पामध्ये राज्य मराठी विकास संस्थेने सक्रिय सहभाग घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत ६ स्तरांचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम पूर्ण झाले असून परिचारिकांसाठीचा तसेच रिक्षा, टॅक्सीचालक यांच्यासाठीचा लघुअभ्यासक्रमही तयार करण्याचे कामही पूर्ण करण्यात आले आहे.

या अभ्यासक्रमांतर्गत पाठ्यपुस्तके, अभ्यासपुस्तके, शब्दसंग्रह आणि संपादित/ निर्मित दृकश्राव्य सामग्री ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांची १-६ ह्या स्तरांवरील सामग्री संस्थेच्या संकेतस्थळावर मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) परवान्याअंतर्गत उपलब्ध आहे.

२७ फेब्रुवारी, २०२२ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे.

http://rmvs.marathi.gov.in/1628

**(७) मराठी दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण :-**

आजवर प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांपैकी ज्यांच्या स्वामित्व हक्काची मुदत संपली आहे, असे मराठी भाषेतील दुर्मिळ ग्रंथ आणि नियतकालिके ह्यांचे संगणकीकरण करून ते महाजालावर जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी तरतूद महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि समाज जीवन ह्यासंदर्भातील ऐतिहासिक ठेवा जतन करण्याच्या हेतूने मराठीतील दुर्मिळ पुस्तके आणि नियतकालिके ह्यांचे संगणकीकरण (डिजिटायजेशन) करून ते जनतेला उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. आतापर्यंत टप्प्यात १२९ पुस्तके व विविध नियतकालिकांचे मिळून ५५५ अंक संस्थेच्या संकेतस्थळावर (http://rmvs.marathi.gov.in/books) उतरवून घेण्यासाठी (डाऊनलोड) करून देण्यात आले आहेत.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अशा स्वरूपाचे काम अन्य संस्था ही करत असल्याने कामाची पुनरावृत्ती टळावी ह्यासाठी दुसऱ्या टप्प्यांतर्गत महाराष्ट्रातील विविध शतायू ग्रंथालयांची १ कार्यशाळा संस्थेने आयोजित करून त्यात ठरल्याप्रमाणे दुर्मिळ ग्रंथांची माहिती नोंदविण्यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावर सोय करून देण्यात आलेली होती.

सार्वजनिक वाचनालय, राजगुरुनगर या ग्रंथालयाने संस्थेच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्याने २५ दुर्मिळ ग्रंथांच्या संगणकीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून ही सामग्री विकिकॉमन्सवर शोधसुकर स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली असून, संस्थेच्या **https://rmvs.marathi.gov.in/category/grant-books** ह्या संकेतस्थळावरही ग्रंथांच्या प्रती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**https://commons.wikimedia.org/wiki/Category:Books_with_Public_Library,_Rajgurunagar_published_before_**1990

तसेच पुढील नियतकालिके व पुस्तकांची सामग्री ह्यांचे संगणकीकरण तसेच महाजालावर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

- बापूराव नाईक ह्यांच्या साठवणीतील दुर्मिळ पुस्तके **https://rmvs.marathi.gov.in/**3093
- नवभारत ह्या नियतकालिकाच्या स्कॅन केलेल्या प्रती महाजालावर चढवण्याची प्रक्रिया संस्थास्तरावर सुरू आहे. **https://archive.org/details/@rajya_marathi_vikas_sanstha**
- नवी क्षितिजे (संगणकीकरण आणि महाजालावर चढवणे)
- तपशील (संगणकीकरण आणि महाजालावर चढवणे)
- भाषा आणि जीवन तपशील (संगणकीकरण आणि महाजालावर चढवणे)
- मॅक्सीन बर्नसन ह्यांची पुस्तके (संगणकीकरण आणि महाजालावर चढवणे)

**(८) विधिशास्त्र संज्ञा-संकल्पना कोश :-**

विधि व न्याय व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या संज्ञा-संकल्पना सर्वसामान्य जनतेस कळण्यास मदत व्हावी, हा मुख्य उद्देश असलेला विधिशास्त्र संज्ञा- संकल्पना कोश तयार करण्याचे नियोजित आहे. अधिवक्ता स्व. शांताराम दातार हे या कोशाचे प्रमुख संपादक व समन्वयक म्हणून काम करत होते. तथापि त्यांचे निधन झाल्यामुळे सदर प्रकल्प गुणवत्तापूर्ण रितीने पूर्ण करण्यास योग्य अशा संपादकांचा शोध चालू आहे.

**(९) प्रा. न. र. फाटक यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची :-**

प्रा. नरहर रघुनाथ फाटक हे मराठीतील प्रसिद्ध इतिहास संशोधक, व्यासंगी प्राध्यापक व चिकित्सक पत्रकार, वादपटू संपादक तसेच, चरित्रकार आहेत. तसेच संगीतापासून खाद्यपदार्थांपर्यंत विविध विषयांवर लिखाण केले आहे. हे लिखाण अनेक वर्तमानपत्रे, नियतकालिके तसेच दिवाळी अंकांमध्ये विखुरले आहे. या साहित्याचा तसेच प्रा. न. र. फाटक ह्यांच्याविषयी त्यांच्या हयातीत व निधनानंतर प्रसिद्ध झालेल्या साहित्याची वर्णनात्मक सूची करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सूचिकार डॉ. सुषमा पौडवाल ह्यांच्याद्वारे ह्या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

**(१०) पुस्तकांचे गाव : भिलार**

वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी लोकसहभागातून साकारलेला पुस्तकांच गाव हा नावीन्यपूर्ण प्रकल्प महाबळेश्वर जवळील भिलार या निसर्गरम्य गावी हा अभिनव प्रकल्प दिनांक ४ मे, २०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आला. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झालेला आणि जगाच्या नकाशावर पोहोचलेला हा अभिनव प्रकल्प आहे. भारतातील पहिले

पुस्तकांचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. सदर प्रकल्प म्हणजे शासनाचा पुढाकार आणि गावाचा सहभाग याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

पुस्तकांच गाव, संकेतस्थळ **https://www.pustakanchgaav.in**

भिलार हे महाबळेश्वर आणि पाचगणी या थंड हवेच्या सुप्रसिद्ध ठिकाणांजवळचे गाव. धबधबा, घनदाट वनराई, पक्ष्यांचा किलबिलाट, थंड व स्वच्छ हवा आणि नीरव शांतता यांचा अनुभव देणारे निसर्गरम्य भिलार गाव हे स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठी ही प्रसिद्ध तसेच ग्रामस्थांचा उत्साह, औदार्य आणि आदरातिथ्य यांचीही अनुभूती देणारे गाव, भिलार गावातील घरे, लॉज आणि शाळा, मंदिरे अशी सार्वजनिक ठिकाणे मिळून ३५ जागा निवडण्यात आल्या आहेत. या जागांमध्ये साहित्य प्रकारांनुसार प्रत्येकी सुमारे ८०० ते १००० पुस्तके, अशी सुमारे ३०,००० पुस्तकांचा अद्भुत खजिना... वाचण्यासाठी विनामूल्य ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक घरात, पर्यटकांना पुस्तके व्यवस्थित पाहता येतील, चाळता येतील आणि प्रसंगी आरामात बसून वाचता येतील अशी व्यवस्था आहे. संबंधित घरमालकांनी त्यांच्या घरांतील सुमारे १५० चौ. फु. ते ५०० चौ. फु. जागा वाचन सेवेसाठी विनाशुल्क / विनामोबदला उपलब्ध करून दिली आहे. तसेच ३ मंदिरांजवळ निवडक ५० मराठी साहित्यिकांची माहिती साहित्यिक प्रदर्शनीद्वारे प्रदर्शित करण्यात आली आहे.

व्यक्तिगत किंवा गटांनी येणाऱ्या पर्यटकांना भाषेची गोडी लागावी आणि मराठी शद्बसंग्रह वाढावा म्हणून त्यांच्यासमोर भाषिक खेळांचे सादरीकरणही करण्यात येते. दि. ०४ मे, २०१७ पासून ते आतापर्यंत सुमारे ३.५ लक्ष लोकांनी प्रकल्पास भेट दिली आहे.

वाचन संस्कृतीसाठी पूरक, बोधपर असे विविध प्रशिक्षणात्मक कार्यक्रम, कार्यशाळा (शिक्षक, विद्यार्थी, ग्रंथपाल), शद्बजत्रा, वाचन कौशल्य विकास, साहित्यिक परिचय, कविता-गीते, काव्यसंमेलन, वाचनध्यास, पुस्तकजत्रा, सांस्कृतिक परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादी साहित्यिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

पुस्तकांचं गाव, भिलार प्रकल्प कार्यालयाच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने 'शद्बजत्रा – भाषिक खेळ' (मराठी नाव, गाव, फळ, फुल आणि शद्बहौशी) ग्रंथदिंडीचे इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गावात विविध ठिकाणी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्तचे सेल्फी फलक लावण्यात आले. तसेच राज्य मराठी विकास संस्थेची निवडक प्रकाशने (मराठी लेखन मार्गदर्शिका, शालेय मराठी शद्बकोश, विज्ञान संकल्पना कोश) बक्षिस स्वरूपात देण्यात आली. "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२३ या कालावधीत प्राथमिक गट (इ. ३ री ते इ. ४ थी), उच्चप्राथमिक गट (इ. ५ वी ते इ. ७ वी), मध्यम गट (इ. ८ वी ते इ. १० वी), उच्चमाध्यमिक गट (इ. ११ वी ते १२ वी) या गटांमधील मुलांमध्ये तालुकास्तरीय निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली.

दि. २२ मे २०२३ रोजी मा. महामहीम राज्यपाल मा.श्री. रमेश बैस यांनी प्रकल्प कार्यालय व विविध दालनांस भेट दिली. तसेच, दि. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी केंद्रीय मंत्री पृथ्वी व विज्ञान मा. श्री. किरण रेजिजू यांनी प्रकल्पास व विविध दालनास भेट दिली.

वाचन प्रेरणादिनाचे औचित्य साधून १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व वाचनसंस्कृती वाढावी या उद्देशाने भिलार प्रकल्प कार्यालयाच्यावतीने "वाचनसंस्कृती" या विषयावरील व्याखानाचे आयोजन करण्यात आले. व्याखानासाठी प्रमुख पाहुणे मा.श्री. राजा दिक्षित अध्यक्ष, विश्वकोश मंडळ व बालसाहित्यिक मा. श्री. एकनाथ आव्हाड यांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक,

ग्रामस्थ असे एकूण ५०० पेक्षा अधिक लोक उपस्थित होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घेण्यात आलेल्या महाबळेश्वर तालुकास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना या कार्यक्रमात स्मृतीचिन्ह, पुस्तके तसेच प्रमाणपत्र, प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

**(११) महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन :**

महाराष्ट्रातील मराठी बोलीभाषा कालांतराने व्यपगत होऊ नयेत यासाठी त्या भाषांचे संगणकीय जतन, संवर्धन करण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रतिमांकन (डिजीटायझेशन) करण्याचा प्रकल्प डेक्कन कॉलेज, पुणे या अभिमत विद्यापीठाच्या सहयोगातून सुरू आहे.

महाराष्ट्रातील मराठीच्या प्रादेशिक भेदांचे सर्वेक्षण आणि त्याद्वारे मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण, प्रतिमांकन आलेखन करणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. प्रकल्पाद्वारे संकलित झालेली माहिती आणि तिचे विश्लेषण मुक्त स्वरूपात संकेतस्थळावरून उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रकल्पाच्या अहवाललेखनाचे काम सुरू असून ते अंतिम टप्प्यात आहे.

दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री मराठी भाषा तसेच मा.राज्यमंत्री, मराठी भाषा ह्यांच्या उपस्थितीत सदर प्रकल्पाच्या संकेतस्थळाचे (https://sdml.ac.in/mr) लोकार्पण करण्यात आले असून, सर्वेक्षणाची सामग्री आणि तिचे विश्लेषण मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) स्वरूपात संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**(१२) समांतर पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी अनुदान :**

सुहृद मंडळ, पुणे या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, कर्णबधिर व अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बालभारतीची समांतर पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी मराठी भाषेच्या पुस्तकांच्या छपाईचे काम पूर्ण झाले व महाराष्ट्रातील १७० विशेष (कर्णबधिर) शाळांना प्रत्येक विषयावर समांतर पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले .

**(१३) आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण : शिल्पकार चरित्रकोश प्रकल्प :**

एकोणिसावे व विसावे शतक हे भारताचे प्रबोधनपर्व मानले जाते. आपली प्राचीन संस्कृती आणि पाश्चात्त्य देशातून आलेली आधुनिकता यांच्या परस्पर संवादातून आणि समन्वयातून जीवनाच्या विविध क्षेत्रांत मूलभूत परिवर्तन घडले. या सर्व परिवर्तनात महाराष्ट्र कायम अग्रेसर राहिला. ज्या व्यक्तींनी हे परिवर्तन घडवून आणले, त्यांचे स्मरण, त्यांच्या कार्यांची माहिती व त्यांच्या जगण्याच्या प्रेरणा महाराष्ट्रातील नव्या पिढीला माहीत व्हाव्या, या दृष्टीने या प्रकल्पाद्वारे हा परिवर्तनाचा आलेख महाराष्ट्रासमोर ठेवावा, हा प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाचे औचित्य साधून साप्ताहिक विवेकने हा प्रकल्प हाती घेतला आहे. गेल्या दोनशे वर्षांत आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा परिचय महाराष्ट्राला घडावा, या दृष्टीने या प्रकल्पाची आखणी केली आहे.

या अंतर्गत एकूण ९ खंड प्रकाशित आहेत. खंड : १० पूर्ण असून उर्वरित २ खंडाचे व दृकश्राव्य विभागाचे काम चालू आहे. हे काम **https:/maharashtranayak.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(१४) रंगवैखरी :**

मराठी भाषा आणि साहित्य या विषयाला केंद्रभूत मानून महाविद्यालयीन स्तरावर संस्थेने दिलेल्या विषयावर साहित्य, चित्र, शिल्प, नृत्य, संगीत या कलांच्या एकत्रित नाट्याविष्कार असलेली आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा यामधील पुरस्कारप्राप्त नाट्याविष्कार युट्यूब वाहिनीद्वारे सर्व जनतेस उपलब्ध करून दिले जातात.

**१.** पर्व पहिले सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्रातील स्पर्धा केंद्रातून एकूण २५ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

**२.** पर्व दुसरे सन २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र व बेळगाव या स्पर्धा केंद्रांमधून एकूण ७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

**३.** पर्व तिसरे सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र व बेळगाव या स्पर्धा केंद्रांमधून एकूण ८५ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

गेली दोन वर्षे कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे — स्थगित ठेवण्यात आली होती. तथापि आता परिस्थिती पूर्व पदावर आली असल्याने संस्थेच्या विहित कार्यपद्धतीला अनुसरून यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येणार आहे.

**(१५) महाराष्ट्रातील मराठी संशोधन संस्था/ मंडळे यांना अर्थसहाय्य करणे :**

मराठी भाषा व साहित्य वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ व संस्थांना रु. पाच लक्षच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाते. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण १२ संस्था / मंडळाना करार करून अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामधील २ संस्था/मंडळांनी केलेले काम संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. उर्वरित प्राप्त संस्था मंडळांच्या अहवालावर कार्यवाही चालू आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी ३ संस्था/मंडळांना अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे या योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी अर्ज मागविणे शक्य झाले नाही.

या योजनेच्या अनुषंगाने सन २०२२-२३ या वर्षातील या योजनेअंतर्गत एकूण ४९ संस्था व मंडळ यांचे अर्ज संस्थेस प्राप्त झालेले आहेत. याबाबत संस्थेच्या विहित कार्यपद्धतीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**(१६) गीतार्णवाचा शब्दार्थ-संदर्भ-कोश** :

नाथपंचकातील एक महत्त्वाचे कवी दासोपंत यांनी लिहिलेली गीताटीका म्हणजेच गीतार्णव हा ग्रंथ होय. या ग्रंथाचे १८ अध्याय असून, त्यामध्ये १,२५,००० ओव्या आहेत. या टीकेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे दासोपंताने आपल्या टीकेत मराठी शब्दांना संस्कृत शब्दापेक्षा अधिक महत्व दिले. ही मराठी भाषेतील एकमेव विस्तृत गीताटीका असून, ती साहित्य गुणांनीही संपन्न आहे. या साहित्यकृतीतील मराठी भाषेचे आणि मराठी साहित्याचे वैभव मराठी भाषिकांना कळावे व अभ्यासकांना त्याचा उपयोग व्हावा. याकरिता ‘‘गीतार्णवाचा शब्दार्थ-संदर्भ-कोशŠ हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्थेने हाती घेण्यात आला होता.

सदर प्रकल्प सन २०२२ साली पूर्ण झाला असून सदर कोश राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर https://rmvs.marathi.gov.in/60 या दुव्यावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**(१७) संस्थेचे मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर :**

मराठीतील वाङ्मयीन ठेव्याची/ ग्रंथसंपदेची व्याप्ती, मराठी भाषेचे विविध आयाम ग्रंथरूपाने दाखविणे, नवीन पिढीवर वाचन-लेखन संस्कार करणे हे संस्थेचे उद्देश असून, त्यासाठी विद्यापीठीय पातळीवर अभ्यास करताना मराठी भाषा, व्याकरण, बोली, लिपी, साहित्य वाङ्मयेतिहास, संस्कृती, समाजशास्त्र इत्यादी आंतरशाखीय अभ्यासाच्या या दिशांनी संशोधन, लेखन, संपादन व्हावे या दृष्टीने हे ग्रंथसंग्रहालय समृद्ध आहे. ह्या संदर्भ-ग्रंथालयाद्वारे अभ्यासकांना सशूल्क सेवा देण्यात येतात.

तसेच प्रतिमुद्राधिकार संपलेल्या ग्रंथांचे/ नियतकालिकांच्या अंकांचे संगणकीकरण करणे, विविध कार्यशाळा, चर्चासत्रांचे आयोजन करणे तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करणे असे विविध उपक्रम राबवण्यात येतात.

**(१८) वऱ्हाडी बोली प्रकल्प** :

वऱ्हाडी बोलीतील शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचे अर्थ विशद करणारा असा हा कोश असून, त्याचे संपादन प्रा.डॉ. विठ्ठल वाघ यांनी केलेले आहे. वऱ्हाडी बोलीतील शब्दभांडार, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश शक्य त्या प्रमाणात प्रमाण मराठी भाषेत होऊन प्रमाण मराठी भाषेचा परीघ वाढविणे, हे प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

सदर प्रकल्पाचे-अंतर्गत दि २७ फेब्रुवारी, २०२१ (मराठी भाषा दिन) या दिवशी वऱ्हाडी बोली शब्दकोशाचे चार खंड प्रकाशित करण्यात आले. (१) वऱ्हाडी शब्दकोश खंड १ : भाग-१, (२) वऱ्हाडी शब्दकोश खंड २ : भाग-२, (३) वऱ्हाडी वाक्प्रचार : खंड ३ (४) वऱ्हाडी म्हणी: खंड ४. सदर चारही खंड संस्थेच्या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनामुल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(१९) देवनागरी टंकाविषयी पुस्तक :**

देवनागरी टंकांविषयीची तांत्रिक जाण वाढावी यासाठी आवश्यक ती माहिती पुरवणारे पुस्तक संस्थेद्वारे तयार करून वितरीत करण्यात येणार आहे.

देवनागरीची मुद्रणपरंपरा, त्यामुळे निर्माण होणारी काही वैशिष्ट्ये, देवनागरी अक्षरकारांची रचनावैशिष्ट्ये, देवनागरी टंकांची रचनावैशिष्ट्ये, टंकांचे प्रकार, टंकांचा वापर करताना लक्षात घ्यावयाची तत्वे, टंक वापरणाऱ्यांना सहाय्यभूत ठरतील असे टंकरचनेच्या प्रक्रियेतील काही मुद्दे, टंकांसंदर्भातील विविध अडचणी व त्यांच्या सोडवणूकीचे उपाय, काही समस्या, देवनागरी टंकरचनाकारांची थोडक्यात माहिती इ.मुद्यांचा या पुस्तकात समावेश असणार आहे. सदर पुस्तकाच्या लेखनाचे काम जवळपास पूर्ण झाले असून परीक्षण, मांडणी इ. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर हे पुस्तक संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येईल.

**(२०) पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथाचा मराठी अनुवाद** :

अष्टाध्यायी हा पाणिनीकृत संस्कृत व्याकरणावरील प्रसिद्ध ग्रंथ असून भारतीय भाषाभ्यासाच्या परंपरेतील महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. ह्या ग्रंथामध्ये आठ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायामध्ये प्रत्येकी चार पाद, असे मिळून एकूण बत्तीस पाद आहेत. ह्या प्रत्येक पादात सूत्रे आहेत.

अष्टाध्यायी ह्या ग्रंथाची विविध भारतीय आणि परदेशी भाषांत भाषांतरे झालेली आहेत. मात्र ह्या संपूर्ण ग्रंथाचे मराठी भाषांतर अद्याप झालेले नाही. त्यामुळे या ग्रंथाचे सटीप मराठी भाषांतर करण्याचा प्रकल्प संस्थेद्वारे हाती घेण्यात येत आहे.

सदर ग्रंथ तांत्रिक स्वरूपाचा असल्याने तो समजून घेण्यासाठी अनुवादाबरोबर टिपा जोडणे तसेच दिलेल्या व्याकरणिक प्रक्रिया सविस्तर समजावून देणे आणि महत्त्वाच्या विषयांचे सांकल्पनिक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. सदर भाषांतराला ह्याही गोष्टींची जोड देण्यात येणार आहे.

पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथाचा अनुवाद ह्या प्रकल्पाचे काम डॉ. मल्हार कुलकर्णी, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी.), पवई, मुंबई ह्यांच्याकडून करण्यात येत आहे.

**(२१) मराठी विकिपीडिया कार्यशाळा :**

“मराठी भाषा संवर्धन पंधरवडा” निमित्त दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत दरवर्षी महाराष्ट्रातील निवडक विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विकिपीडिया परिचयाचत्मक कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदानाविषयी राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि समाजशास्त्र विभाग, पीपल्स महाविद्यालय, नांदेड, ह्यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी-विकिपीडिया-लेखन-कार्यशाळेचे आयोजन दि. ३ एप्रिल २०२३ रोजी पीपल्स कॉलेज, नांदेड येथे मराठी करण्यात आले.

**आगामी प्रकल्प/उपक्रम**

**१) दासोपंतकृत ‘गीतार्णव’ ची समग्र संहिता संस्थेच्या महाजालावर उपलब्ध करून देणे :**

दासोपंत हे १५-१६ व्या शतकातील एकनाथ पंचकातील संतकवी, भाष्यकार, तत्त्वचिंतक, वाग्गेयकार म्हणून प्रख्यात आहेत. दासोपंतांची ‘गीतार्णव’ ही रचना गीताभाष्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे ह्यापूर्वी दासोपंतरचित गीतार्णव ह्या ग्रंथाचा शब्दार्थ-संदर्भ-कोश तयार करण्याचा प्रकल्प राबवला होता. तथापि हा शब्दार्थ-संदर्भ-कोश ज्या गीतार्णव ह्या ग्रंथावर आधारित आहे तो गीतार्णव हा ग्रंथही संपूर्ण स्वरूपात प्रकाशित झालेला नाही. त्यामुळे शब्दार्थ-संदर्भ-कोशाच्या संपादक मंडळाशी चर्चा करून गीतार्णवाची संपूर्ण संहिता संपादित करून महाजालावर प्रकाशित करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त करून घेण्यात आला.

सदर प्रकल्पासाठी गीतार्णवाचे मुद्रित अध्याय तसेच, दासोपंत संशोधन मंडळ, बीड ह्यांच्या हस्तलिखित संग्रहातील अधिकृतपणे मान्य असलेल्या प्रतींचा संहिता-निश्चितीसाठी उपयोग करून घेण्यात येईल. तसेच, अन्य संग्रहांत उपलब्ध असलेल्या गीतार्णवाच्या संहितांतीस पाठभेदांचीही नोंद करण्यात येईल.

गीतार्णवचे जे अध्याय हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहेत त्यांचे संहिता वाचन, अर्थपूर्ण आकलन, शद्वशोधन, अक्षरे लावणे, ज्ञानपूर्वक लेखन, ओवी अध्याय यांचे योग्य क्रमवार संकलन व त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्यांचे पुनर्लेखन करण्यात येईल.

**२) श्रमिकांसाठी मराठीचे प्रशिक्षण**

अमराठी भाषिक समाजगटांना मराठी भाषा व संस्कृती यांबद्दल आस्था व रूची निर्माण व्हावी म्हणून विविध साधने विकसित करणे हे उद्दिष्ट साध्ये करणे तसेच मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्याच्या हेतूने मुंबई आणि महानगर परिसरातील परिचारिका, रिक्षा व टॅक्सी चालक, फेरीवाले, श्रमिक, बांधकाम मजूर अशा सुमारे ५००० श्रमिक वर्गातील व्यक्तींना संवादात्मक मराठीचे प्रशिक्षण देण्याची योजना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संकल्पित आहे.

**३) वाङ्मयीन लोकोत्सव :**

‘मराठी भाषा संवर्धन आणि विकास ’ हा राज्य मराठी विकास संस्थेचा मुख्य मूळ उद्देश ध्यानी ठेवून, ‘वाङ्मयीन लोकोत्सव : सन्मान बोली भाषांचा ’ हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रस्तावित करण्यात येत आहे. ‘भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. गणेश देवी यांच्या प्रतिपादनाप्रमाणे ‘जर बोलीभाषाच नसतील तर एखादी मान्य भाषा केवळ अर्थविहिन व पुन:पुन्हा वापरून थकून गेलेले शद्व या स्वरूपातच शिल्लक राहिल.’ मराठीचे असे होऊ नये

आणि मुख्य प्रवाहाला समृद्ध करत मराठीची प्रगल्भता वाढवणाऱ्या तिच्या बोलींचा सन्मान व्हावा, जतन संवर्धन व्हावे, अशी या उपक्रमाची संकल्पना आहे.

उपलब्ध माहितीनुसार (संदर्भ: बोलीभाषा : चिंता आणि चिंतन/संपादन : प्रेमानंद गज्वी आणि डॉ. महेश केळुसकर) मराठी भाषेत आतापर्यंत एकूण ६८ बोली (dialects) आढळलेल्या असून त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे : उत्तर महाराष्ट्र – ५ कोकण – १२, पश्चिम महाराष्ट्र – ५, विदर्भ – ३, मराठवाडा – २, आदिवासी – १५ आणि भटक्या विमुक्तांच्या बोली – २० . यातील काही बोलींचा लोकव्यवहारातील उपयोग क्षीण होत चाललेला असून काही तर नष्ट हेण्याच्या मार्गावर आहेत. टप्प्याटप्प्याने या सर्व बोलींचा लोकोत्सवातील सहभाग वाढवून त्यांचे जतन व संवर्धन करत मराठी भाषा समृद्ध करणे शक्य आहे.

प्रस्तुत वाङमयीन लोकोत्सवातील सर्व परिसंवाद, चर्चा, मुलाखती आणि सादरीकरणाचे ध्वनी-चित्र (audio-visual documentation) दस्तावेज तयार केले जातील. संहिता (text) तयार करून त्यांचे संपादन केले जाईल. राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर (website) हे दस्तावेज उपलब्ध करून दिले जातील.

**राज्य मराठी विकास संस्थेची माहिती rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे**

## राज्य मराठी विकास संस्था

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी Scale of pay (३) | पदांची संख्या (४) | Designation (५) |
|---|---|---|---|---|
| | **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | |
| १. | संचालक | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० | १ | Director |
| २. | उप संचालक | एस-२५ :७८,८००-२,०९,२०० | १ | Dy. Director |
| ३. | वरिष्ठ संशोधन सहायक | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ | Senior Research Assistant |
| ४. | प्रशासकीय अधिकारी | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ | Administrative Officer |
| ५. | कनिष्ठ संशोधन सहायक | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ | Junior Research Assistant |
| ६. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ | Accounts Officer |
| ७. | कार्यासन अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | Desk Officer |
| | | **एकूण (अ)** | **७** | **Total (A)** |
| | **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | |
| ८. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१५ : ३८,६००-१,२२,८०० | १ | Stenographer (L.G) |
| ९. | सहायक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ३ | Assistant |
| १०. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९,९००-६३,२०० | २ | Clerk-Typist |
| ११. | रोखपाल | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | Cashier |
| १२. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | Driver |
| | | **एकूण (ब)** | **८** | **Total (B)** |
| | **(क) वर्ग ड (C) Class D** | | | |
| १३. | शिपाई | एस-१ : १५,०००-४७,६०० | १ | Peon |
| | | **एकूण (क)** | **१** | **Total (C)** |
| | | **एकूण (अ + ब + क)** | **१६** | **Grand Total (A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक-५

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृती विषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

### (१) मंडळाचे मुख्य उद्दिष्ट

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट 'पुस्तक प्रकाशन' हे आहे. या मुख्य उद्दिष्टानुसार सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङमयीन संशोधन या विषयावरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर, वैचारिक, उच्च दर्जाचे बौद्धिक, वाङमयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाही असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङमयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टिपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात.

### (२) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या प्रमुख योजना/उपक्रम सविस्तर माहिती

#### १) मंडळाचा पुस्तक प्रकाशन उपक्रम -

शासन निर्णय दि. १०.०९.२०१२ व शासन निर्णय दि.०२.०२.२०१६ नुसार **स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाडमय पुरस्कार** योजनेतंर्गत विविध लेखन प्रकारांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांकृती मंडळाच्या वतीने एकूण ३५ पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकास कमी किंमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. सदर योजनेमध्ये वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादि विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. सदर योजनेनुसार मंडळाने आतापर्यंत ६५९ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

#### २) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान -

शासन निर्णय दि.०१.१०.२०१४ नुसार मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्टयपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा तसेचमयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या:ललित साहित्यातील वाड , पुस्तकांना तज्ज्ञांच्या अनुकुल शिफारशीनुसार अनुदान देण्यात येते .

#### ३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान -

शासन निर्णय दि. ०३.११.१९७८ व शासन निर्णय दि.०७.१२.२०१३ नुसार या योजनेअंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही,अशा नवलेखकांना , कथा, कादंबरी, ललित गद्य, काव्य नाट्य (एकांकिका) व बालवाङमय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत २३४७ नवलेखकांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

(शा.म.मु.) एच ४५८-८ (५०—६-२०२४)

**४) नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळांना अनुदान योजना -**

शासन निर्णय दि.२३.११.२००१ व शासन निर्णय दि.०५.०८.२०१९ नुसार नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची १० चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मंडळाकडून महाराष्ट्रभर आजमिती पर्यंत १२६ चर्चासत्रे/कार्यशाळा यांचे आयोजित करण्यात आल्या आहेत.

**५) साहित्य संस्थांना अनुदान -**

या अनुदान योजनेअंतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी (१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ (२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर (३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद (४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई (६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, (७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर अशा ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. ५.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येत होते. शासन निर्णय दि. ०८.११.२०१७ नुसार वित्तीय वर्षे २०१८-१९ पासून सदर अनुदान रु.१०.०० लक्ष करण्यात आले आहे.

तसेच, सन-२०२३-२४ च्या अर्थसंकल्पात घोषणा केल्यानुसार नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त रु.१० कोटी इतका निधी विदर्भ साहित्य संघ, नागपूर या संस्थेस एक वेळची विशेष बाब ठेव म्हणून देण्यास दि.२७.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्ये मान्यता देण्यात आली आहे.

**६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान -**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी रु.२५.०० लाख इतके अनुदान मंडळांमार्फत दिले जात होते. वित्तीय वर्षे सन-२०१८-१९ पासून शासन निर्णय दि.२३.०८.२०१८ नुसार सदर अनुदान रु. ५० लक्ष करण्यात आले आहे. तद्नंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी दरवर्षी रु.२ कोटी इतके अर्थसहाय्य देण्याच्या अनुषंगाने दि.२२.१२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

**७) नियतकालिकांना अनुदान -**

शासन निर्णय दि. १५.०१.२०१४ नुसार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिध्द होणाऱ्या नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान दिले जाते. त्यानुसार मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिद्ध होणाऱ्या ५५ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना -**

शासन निर्णय दि. १०.०९.२०१२ व शासन निर्णय दि.०२.०२.२०१६ नुसार सन २०१२ पासून राज्य वाङमय पुरस्कार योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङमय पुरस्कार योजना या नावाने राबिण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत (अ)प्रौढ वाड्.मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, (ब) बाल वाङमय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व (ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङमय पुरस्कार मंडळाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिनी (दिनांक २७ फेब्रुवारी) प्रदान केले जातात.

**९) ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार -**

शासन निर्णय दि. ३१.०८.२०१२ नुसार साहित्य क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्या वतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**१०) श्री. पु. भागवत पुरस्कार -**

शासन निर्णय दि. ३१.०८.२०१२ नुसार महाराष्ट्रा राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री. पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त) रोख , मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**११) अन्य मराठी साहित्य संमेलनाना अनुदान -**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास रु.५०.०० लाखाचे अनुदान दिले जाते. या मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणे मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळया प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे या सांस्कृतिक धोरणातील सूचनेनुसार मराठी भाषा विभाग शासन निर्णय दि.२६.०६.२०१९ अन्वये मंडळाकडून दरवर्षी रु.२.०० लाखाचे अनुदान अन्य संमेलनांना देण्यात येते.

**१२) बृहद्ग्रंथांचे प्रकल्प योजना** -

मराठी भाषा विभाग शासन निर्णय दिनांक १३ मे २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने 'बृहद्ग्रंथ प्रकल्प' योजना राबविण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यांसारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक,चरित्रात्मक वाङमयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्वपूर्ण, नाविण्यपूर्ण व दुर्मिळ स्वरुपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जातात.

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची माहिती *sahitya.marathi.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## कर्मचारीविषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| २. | सहायक लेखा अधिकारी | एस-१५ ४१८००- १३२३०० | १ | Assistant Account Officer |
| | | **एकूण (अ)** | **२** | Total (A) |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| ३. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | प्रपाठक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Reader |
| ५. | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Stenographer (H.G.) |
| ६. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| **(क) अराजपत्रित** (c) Non-Gazetted | | | | |
| ७. | वरिष्ठ लिपीक | एस-८ : २५५००-८११०० | ४ | Senior Clerk |
| ८. | ग्रंथालयीन सहाय्यक | एस- ७ : २१७००-६९१०० | १ | Assistant Librarian |
| ९. | लिपिक-टंकलेखक | एस- ६ : १९९००-६३२०० | ७ | Clerk-Typist |
| १०. | वाहनचालक | एस- ६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| | | **एकूण (क)** | **१७** | Total (B) |
| **(ड) वर्ग** Class D | | | | |
| ११. | शिपाई | एस- १ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | | **एकूण (ड)** | **२** | Total (C) |
| | | **एकूण (अ + ब + क)** | **२१** | Total (A+B+C) |

## कार्यक्रम क्रमांक ६

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यकारभारासंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांनुसार मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी राज्य शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० रोजी कै.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरू केले, त्यापैकी एक प्रमुख व वैशिष्टयपूर्ण उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोशाची निर्मिती हा होय.

दिनांक ०१ डिसेंबर, १९८० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या राज्यस्तरीय मंडळाची स्थापना झाली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर (दिनांक २७ मे, १९९४) प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. श्रीकांत जिचकार, डॉ. विजया वाड व श्री.दिलीप करंबेळकर यांनी विश्वकोशाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले आहे. डॉ. श्रीधर तथा राजा दिक्षित यांनी दिनांक ०१ जून, २०२१ पासून मंडळाच्या अध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला आहे.

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश आहे. त्यात मानव्य व विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मुलभूत ज्ञानशाखांतील सारभूत माहिती नोंदींच्या/लेखांच्या रुपाने प्रकाशित करण्यात आली आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड वर्णानुक्रमाने (अ ते ज्ञ) प्रकाशित झाले आहेत.

**(१) मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण :**

कालौघानुसार सर्व विषय व ज्ञानशाखांमध्ये झालेले बदल व वाढ यांमुळे विश्वकोशातील अनेक नोंदीमध्ये सुधारणा तसेच, काही अतिरिक्त नोंदी समाविष्ट करणे व अद्ययावतीकरणाचे हे काम कालमर्यादित स्वरूपात करणे आवश्यक बनले आहे. केलेले काम तितक्याच जलद गतीने जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाची मदत घेऊन सर्व ज्ञानशाखातील नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याकरिता विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था इत्यादिंच्या सहकार्याने ज्ञानमंडळे स्थापन करून त्याच्या माध्यमातून मराठी विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्याचे तसेच, नवीन नोंदी समाविष्ट करण्याकरिता ज्ञानमंडळे स्थापन करण्याबाबत शासन निर्णय दि.२३.२.२०१६ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत विविध विषयांची ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे नियोजन असून यापैकी ४५ ज्ञानमंडळे स्थापन होऊन त्यांचे काम सुरू झाले आहे.

मराठी विश्वकोशाचे संपादन कार्य हे विज्ञान व तंत्रविद्या, मानव्यविद्या, कला आणि प्रशासन अशा ४ शाखांमध्ये विभागलेले आहेत. ज्ञानविज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये कायमस्वरुपी तज्ज्ञ संपादन नेमणे शक्य नसल्याने विविध शाखांतील तज्ज्ञांच्या सवडीनुसार अभ्यागत संपादक म्हणून त्यांचे सहकार्य उपलब्ध करून घेण्यात येते. वाई, जिल्हा सातारा येथे विश्वकोशाचे अद्ययावत ग्रंथालय असून त्यामध्ये सुमारे ५० हजारांहून अधिक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत.

**(२) विक्रीस उपलब्ध असलेली प्रकाशने :**

| पुस्तकाचे/सीडीचे नाव | मूळ किंमत (रु.) | सवलतीची किंमत (रु.) |
|---|---|---|
| (१) मराठी विश्वकोश खंड | २५०/- | १७५/- |
| (२) १ ते १७ खंडांच्या ६ सीडींचा संच | १०००/- | ७००/- |
| (३) कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-२ भाग-१ | ५००/- | ३५०/- |

(४) कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-२ भाग-२ — ५००/- — ३५०/-

(५) मराठी-विश्वकोश १ ते २० खंड कार्ड- पेनड्राईव्ह — ८००/- — --

(६) विश्वकोशाचे सर्व खंड मोबाईल ॲपच्या स्वरूपात उपलब्ध

"मराठी विश्वकोश" हे भ्रमणध्वनी ॲप अनन्या मल्टिटेक प्रा.लि. या कंपनीकडून विकसित करण्यात आले असून त्याद्वारे विश्वकोशाच्या १ ते २० खंडातील सर्व नोंदी भ्रमणध्वनीवर आता एका क्लीकवर मोफत उपलब्ध करून दिल्या आहेत. हे उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर सहजरित्या उपलब्ध आहे.

**(३) मंडळाचे आगामी उपक्रम :**

(१) मराठी विश्वकोशाचे सातत्याने अद्ययावतीकरण व प्रकाशन.

(२) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मध्ये आलेला आक्षेपार्ह मजकूर काढून टाकणे तसेच किरकोळ दुरुस्त्या करून नवीन सुधारित दुसरी आवृत्ती छपाई करणे.

(३) कुमार विश्वकोश (खंड – १) (जीवसृष्टी आणि पर्यावरण) भाग-३ व भाग-४ पुस्तक स्वरूपात प्रकाशित करणे.

(४) कुमार विश्वकोश १ ते १२ खंडांचे संपादन व प्रकाशन.

(५) मराठी विश्वकोश खंडांचे मुद्रण-विश्वकोश लेखन, समीक्षण, संपादन व प्रकाशनासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर.

(६) विश्वकोश वार्षिक अहवाल २०२३-२४.

(७) विविध विद्यापीठे / नामांकित संस्था भेटी / दौरे (विश्वकोश प्रचार प्रसार).

(८) आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सभेत विश्वकोश सहभाग (विश्वकोश प्रचार प्रसार).

(९) वाई येथे व संबंध महाराष्ट्रात वाचन प्रेरणा दिन सादरीकरण.

(१०) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरीकरण.

(११) कुमार विश्वकोश खंड २ भाग-३, दृकश्राव्य स्वरूपात तयार करणे.

(१२) बालकोश नियोजनाची कामे.

(१३) विश्वकोशाचे माहिती पुस्तक नव्याने तयार करून प्रसिध्द करणे.

(१४) मंडळाच्या संकेतस्थळावरील नोंदीचे पुनर्वाचन करून त्यातील त्रुटी दूर करणे.

**(४) ऑलिंपिक माहितीकोश :-**

ऑलिंपिक माहितीकोश या प्रकल्पा अंतर्गत शाळा, महाविद्यालये शारीरिक शिक्षण महाविद्यालये, क्रीडा संघटना, खेळाडू यांना ऑलिंपिक खेळाविषयी माहिती देणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. कारण अद्याप मराठी भाषेत ऑलिंपिक या खेळाबद्दल एकत्र माहिती असणारे पुस्तक किंवा पुस्तक समूह/पुस्तक मालिका, अंक/खंड उपलब्ध नाहीत. यामुळे सदर प्रकल्प हा महत्त्वाचा ठरतो. सदर माहितीकोश पाच खंडात ई-पुस्तक स्वरूपात तयार करण्यात येणार असून प्रत्येक खंड साधारणपणे १००० पृष्ठांचा असेल. मंडळाचे अध्यक्ष प्रा.श्री.म.तथा राजा दीक्षित हे या माहितीकोशाचे प्रमुख संपादक आहेत.

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची माहिती *marathivishwakosh.org.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

### कर्मचारीविषयक गोषवारा

Personnel Summary

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (SCALE OF PAY) | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| **(१) प्रशासकीय कार्यालय, मुंबई** (1) Administative Office, Mumbai | | | | |
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| २ | सहाय्यक लेखाधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Account Officer |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| ३. | अधिक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | २ | Lower Grade Stenographer |
| ५. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Vidya Vyasangi Assistant |
| ६. | वरिष्ठ लिपीक | एस-८ : २५५००-८११०० | २ | Senior Clerk |
| ७. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Clerk-Typist |
| ८. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| **(क) वर्ग ड** (C) Class D | | | | |
| ९. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | **एकूण (१)** | | **१३** | Total **(1)** |
| **(२) वाई कार्यालय** (2) Wai Office | | | | |
| **(अ) राजपत्रित** (A) Gazetted | | | | |
| १. | सहायक सचिव | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Secretary |
| **(ब) अराजपत्रित** (B) Non-Gazetted | | | | |
| २. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ७ | Vidya Vyasangi Assistant |
| ३. | संपादकीय सहायक | एस-१० : २९२००-९२३०० | ७ | Editorial Assistant |
| ४. | ग्रंथालयीन सहायक | एस-७ : २१७००-६९१०० | २ | Library Assistant |
| ५. | लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) | एस-६ : १९९००-६३२०० | ५ | Clerk-Typist |
| **(क) वर्ग ड** (C) Class D | | | | |
| ६. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ५ | Peon |
| | | | | |
| | **एकूण (२)** | | **२७** | Total (2) |
| **(३) ठोक मासिक मानधन** (3) Gross Monthly Honorarium | | | | |
| १. | विभाग संपादक (कंत्राटी) | २१००० | २ | Section Editor |
| २. | सहसंपादक (कंत्राटी) | १४००० | २ | Joint Editor |
| ३. | कला संपादक (कंत्राटी) | ११००० | १ | Art Editor |
| | **एकूण (३)** | | **५** | Total (3) |
| **एकूण (१ + २ + ३)** | | | **४५** | Total (**1 + 2 + 3**) |

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२४-२५

# मराठी भाषा विभाग

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

२०२४